रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ३२५
www.ramprahar.com

गुरुवार, १२ जून २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पुन्हा कंत्राटी स्वरूपात सरकारी नोकरी



**मुंबई :** राज्य सरकारच्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना पुन्हा एकदा सरकारी नोकरीत रूजू होता येणार आहे, मात्र ही नियुक्ती कंत्राटी स्वरूपात असणार आहे. राज्य सरकारने बुधवारी (दि. ११) ही घोषणा केली असून या अंतर्गत सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना एक ते तीन वर्षांसाठी काम करता येणार आहे. यात करारपद्धतीने नियुक्ती केलेली व्यक्ती वयाच्या ६५ वर्षांपर्यंतच कार्यरत राहू शकेल. एखाद्या अधिकाऱ्याची सेवा त्यानंतरही चालू ठेवायची असेल तर वरिष्ठ अधिकाऱ्याची मान्यता लागेल, मात्र कोणत्याही परिस्थितीत करारपद्धतीने नियुक्ती केलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्याला वयाच्या ७० वर्षांपर्यंतच कार्यरत राहता येणार आहे. त्याला संबंधित कामाचा किमान तीन वर्षांचा अनुभव असणे बंधनकारक असेल तसेच त्याची कोणतीही विभागीय चौकशी सुरू नसावी किंवा त्याला चौकशी प्रकरणात कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

अंतरंग

म्हसळा शहरात ट्रॅफिक जाम; पोलीस उतरले रस्त्यावर/२

श्रीवर्धनच्या मध्यवर्ती प्रशासकीय भवनाला गळती/५

आंतरराष्ट्रीय निवृत्तीनंतर पूरन बनला कर्णधार!/८

# स्व. रावसाहेब शिंदेंच्या आठवणींना उजाळा

## श्रीरामपूर येथील कार्यक्रमास लाभली मान्यवरांची उपस्थिती





**श्रीरामपूर (अहिल्यानगर) : प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष दिवंगत ॲड. रावसाहेब शिंदे यांची जयंती, ज्युनिअर कॉलेजच्या नूतन वास्तूचे उद्घाटन आणि पुरस्कार प्रदान सोहळा बुधवारी (दि. ११) श्रीरामपूर येथे रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या वेळी उपस्थित मान्यवरांनी ॲड. शिंदे यांच्या कार्याचा आढावा घेऊन आठवणींना उजाळा दिला.

ॲड. रावसाहेब शिंदे प्रतिष्ठान संचालित विद्यानिकेतन शैक्षणिक संकुलात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, उपाध्यक्ष भगीरथ शिंदे, खासदार निलेश लंके, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, एमकेसीएलचे अध्यक्ष विवेक सावंत, 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, अरुण कडू, मीनाताई जगधने, अविनाश आदिक, डॉ. राजीव शिंदे, डॉ. प्रेरणा शिंदे, टी.ई. शेळके, डॉ. शंकरराव गागरे, लकी सेठी, रोहित शिंदे, रश्मी शिंदे आदी उपस्थित होते.

संगणक साक्षरतेच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांपर्यंत तंत्रज्ञान पोहचवणारे एमकेसीएलचे प्रमुख विवेक सावंत यांना या वेळी ॲड. रावसाहेब शिंदे स्मृती पुरस्कार प्रदान करण्यात आला. **(पान २ वर..)**

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून ५० लाखांची देणगी

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या भाषणात, रावसाहेब शिंदे हे जीवनभर गरिबांसाठी जगले. त्यांच्या विचारांचा प्रभाव माझ्या जीवनावर झाला, असे सांगून संस्थेच्या कार्यासाठी ५० लाख रुपयांची अतिरिक्त देणगी जाहीर केली. रावसाहेब म्हणायचे, जो देतो तो देव, जो राखतो तो राक्षस. त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन मी ही मदत करत आहे, असेही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगितले.





**शिर्डी : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी बुधवारी शिर्डी येथे साईबाबांच्या मंदिरात जाऊन दर्शन घेतले. या वेळी त्यांनी श्री साईबाबा संस्थान ट्रस्टच्या वैद्यकीय फंडामध्ये १० लाख रुपयांची देणगी दिली. ट्रस्टच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख सोबत होते.**

# इंदापूर, माणगावमधील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी चार पर्यायी रस्त्यांची कामे

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर इंदापूर आणि माणगाव बायपास रस्त्याचे काम पूर्ण होईपर्यंत प्रवाशांची वाहतूक कोंडीतून सुटका होणे आवश्यक आहे. त्यासाठी मोरबा रोड ते मुंबई-गोवा हायवे रस्ता, साईनगर कालवा ब्रिज ते उत्तेखोल कालवा गावापर्यंतचा रस्ता आणि निजामपूर रोड कालवा ते भादाव रस्ता हे माणगाव नगरपंचायत हद्दीतील तीन रस्ते आणि मुंबई-गोवा महामार्गावरील इंदापूर कॅनल रस्ता ते विगवली फाटा रस्ता अशा चारही रस्त्यांच्या कामांसाठी आवश्यक १५ कोटी रुपयांचा निधी तातडीने उपलब्ध करून देण्यात येईल. ही कामे पूर्णत्वास नेण्याची कार्यवाही तातडीने करावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बुधवारी (दि. ११) दिले.



मंत्रालयातील उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या समिती कक्षात मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग इंदापूर बायपास, माणगाव बायपास रस्त्यांच्या कामासंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. उपमुख्यमंत्री अजित पवार दूरदृश्यसंवाद प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते, तर बैठकीस सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव राजेश देशमुख, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव (बांधकामे) संजय दशपुते, कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, रायगडचे जिल्हाधिकारी किसन जावळे, रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्यासह राष्ट्रीय महामार्ग विभाग, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

१८ मे रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रायगड जिल्ह्यातील या महामार्गाच्या कामाची हवाई व प्रत्यक्ष पाहणी केली होती. त्या वेळी त्यांनी दिलेल्या आश्वासनानुसार बुधवारी मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. **(पान २ वर..)**



## निवडक

### ट्रेन सुटायच्या २४ तास आधी जाहीर होणार तिकीट आरक्षण

**नवी दिल्ली :** भारतीय रेल्वेने प्रवाशांच्या सुविधेकडे अधिक लक्ष देत काही बदल करण्याचे ठरवले आहे. याचाच एक भाग म्हणून रेल्वे प्रवाशांची तिकीट आरक्षण यादी आता प्रवास सुरू होण्याच्या २४ तास आधी तयार केली जाईल. दरम्यान, आधार कार्ड आणि ओटीपीशिवाय तत्काळ तिकिट बुक करता येणार नाही. १ जुलैपासून तत्काळ तिकिटे बुक करण्यासाठी 'आधार' आधारित ओटीपी आवश्यक असणार आहे.

### सोनमकडून पती राजा रघुवंशीच्या हत्येची पोलिसांसमोर कबुली

**शिलाँग :** राजा रघुवंशी हत्याकांडाची अखेर पत्नी सोनम रघुवंशी हिने कबुली दिली आहे. पोलिसांनी सोनम आणि तिचा प्रियकर राज कुशवाह यांची समोरासमोर बसवून चौकशी केली. ४२ सीसीटीव्ही फुटेज, रक्ताने माखलेले जॅकेट, सोनमचा रेनकोट असे अनेक पुरावे समोर ठेवण्यात आले. हे सर्व पुरावे पाहिल्यानंतर सोनम रडू लागली आणि आपण राज कुशवाह तसेच इतर तीन सुपारी किलर्स आकाश राजपूत, विशाल उर्फ विक्की ठाकूर आणि आनंद कुर्मी यांच्यासह मिळून राजा रघुवंशी यांची हत्या घडवून आणल्याचे कबूल केले.

# भविष्यात एसटीच्या सर्व बसेस इलेक्ट्रिक

## परिवहनमंत्र्यांची घोषणा; डेपोंचाही होणार कायापालट



**पुणे : प्रतिनिधी**

राज्य परिवहन महामंडळातील सर्व बसेस इलेक्ट्रिक करणार असून पुढील १० वर्षात जुन्या एसटी बसेस टप्प्याने बंद केल्या जातील आणि त्या जागी नवीन बसेस येतील, अशी घोषणा राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी पुण्यात केली. त्याचप्रमाणे राज्यातील सर्व एसटी बस आणि डेपो अद्ययावत करण्याचे काम दोन महिन्यात सुरू होणार असून सुरक्षा आणि स्वच्छता याचा विचार करून काम केले जाईल, असे आश्वासन सरनाईकांनी दिले.

परिवहनमंत्री प्रताप सरनाईक बुधवारी (दि. ११) कार्यक्रमानिमित्त पुण्यात होते. माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी एसटीच्या विकासाचा प्लान मांडला. एसटी खात्यात पाच हजार बस घेणार असून त्यापैकी एक हजार बस या इलेक्ट्रिक घेण्याचे संकेत त्यांनी दिले. पुढील काही वर्षात एसटीच्या सर्व बसेस इलेक्ट्रिक असतील. २०२९पर्यंत ताफ्यात २५ हजार बसेस दाखल होणार आहेत, असे त्यांनी सांगितले.

मंत्री सरनाईक यांनी या स्मार्ट बसमध्ये सर्व आवश्यक सेवा-सुविधा आणि सुरक्षितता यंत्रणा असतील, असे सांगून स्वारगेट घटनेच्या पार्श्वभूमीवर बाहेरील व्यक्ती बसमध्ये सहजपणे प्रवेश करू शकणार नाहीत, अशी यंत्रणा बसमध्ये असावी यावर भर दिला. आग किंवा इतर घटना घडल्यास तातडीने प्रतिसाद देणारी यंत्रणा बसमध्ये असणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

बसेस लिझवर न देता काही ठिकाणी त्या तयार करून घेतल्या जातील आणि त्यांची मालकी एसटी महामंडळाकडेच राहील, असेही मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले.

# लोणावळ्यातील पर्यटनस्थळांवर बंदी

**लोणावळा : प्रतिनिधी**

लोणावळ्यासह मावळ तालुक्यातील बहुतांश पर्यटनस्थळी पर्यटकांना बंदी घालण्यात आली आहे. गेल्या वर्षी अख्खं कुटुंब धबधब्यात वाहून गेले होते. या घटनेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रशासनाने ही खबरदारी घेतलेली आहे.



एकवीरा देवी, कार्ला लेणी, भाजे लेणी, भाजे धबधबा, लोहगड किल्ला, विसापूर किल्ला, तिकोणा किल्ला, टायगर पॉईंट, लायन्स पॉईंट, शिवलिंग पॉईंट, पवना डॅम या परिसरात पर्यटकांमुळे गर्दी होत असून त्यावर पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने निर्बंध घालण्यात आले आहेत. हा आदेश ७ जूनपासून ते ३१ ऑगस्टपर्यंत लागू असणार आहे

पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी संबंधित पर्यटनस्थळी कलम १६३ लागू केले असून या ठिकाणी जाऊन नियमांचे उल्लंघन केल्यास त्यांना कारवाईला सामोरे जावे लागणार आहे. दरम्यान, या पर्यटनस्थळांतून भुशी धरण मात्र वगळण्यात आले आहे. त्यामुळे हिरमोड झालेल्या पर्यटकांना भुशी डॅमच्या पायऱ्यांवर भिजण्याचा आनंद घेता येणार आहे.

# रोह्यातील आंबेवाडीत बनावट तणनाशकाचा मोठा साठा जप्त

## विक्रेता ताब्यात; कृषी विभागाची कारवाई

**अलिबाग : प्रतिनिधी**

खरीप हंगामाच्या तोंडावर रोहा तालुक्यात कृषी विभागाने मोठी कारवाई केली आहे. कोलाडजवळील आंबेवाडी परिसरात सुमारे दोन लाख ६९ हजार रुपये किमतीचा बनावट तणनाशकाचा साठा जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी संबंधित विक्रेत्याविरोधात गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेण्यात आले आहे.

आंबेवाडी येथील ओम तेल घाणा केंद्रात अवैध तणनाशक विक्री सुरू असल्याची खबर कृषी विभागाला मिळाली होती. त्यानुसार कृषी विभागाच्या भरारी पथकाने सापळा रचून तणनाशक विक्री करणाऱ्या व्यक्तीस ताब्यात घेतले. तेथील केंद्रातून बनावट तणनाशकाच्या प्रतिलिटर ९६० रुपये किमतीच्या २८० बॉटल जप्त करण्यात आल्या असून जप्त केलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत दोन लाख ६८ हजार ८०० रुपये इतकी आहे.

या विक्रेत्याकडे कुठल्याही प्रकारचा विक्री परवाना, उत्पादन नोंदणी क्रमांक आढळला नाही. त्यामुळे जप्त केलेली तणनाशके विश्लेषणाकरिता प्रयोगशाळेत पाठवण्यात आली आहेत, तर विक्रेत्याला ताब्यात घेण्यात आले आहे.

दरम्यान, बनावट तणनाशकाचा वापर पिकाच्या उत्पन्नावर गंभीर परिणाम करू शकतो. त्यामुळे कोणतेही कीटकनाशक वापरण्यापूर्वी त्याची संपूर्ण माहिती तपासून घेऊनच खरेदी करावी, असे आवाहन कृषी विभागातर्फे करण्यात आले आहे.

**(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

# हरवलेल्या ३१४ मोबाईलचा सीईआयआर पोर्टलद्वारे छडा; रायगड पोलिसांची कामगिरी

**अलिबाग : प्रतिनिधी**



मोबाईल फोन चोरीच्या वाढत्या घटनांना प्रतिबंध घालण्यासाठी केंद्र सरकारच्या टेलिकॉम विभागाने सेंट्रल इक्विपमेंट आयडेंटिटी रजिस्टर (सीईआयआर) पोर्टल विकसित केले आहे. या पोर्टलचा प्रभावीपणे वापर करत रायगड पोलीस दलाने हरवलेल्या ३१४ मोबाईल फोन्सचा शोध लावला. यातील १९५ जणांना त्यांचे हरवलेले फोन परतही करण्यात आले आहेत.

गेल्या सहा महिन्यात रायगड पोलीस दलाच्या हद्दीत ७६४ मोबाईल फोन हरवल्याच्या तक्रारींची नोंद झाली होती. सीईआयआर पोर्टलचा प्रभावीपणे वापर करत रायगड पोलीस दलाने यातील ३१४ फोन्सचा शोधले. यातील १९५ मोबाईल फोन संबधित तक्रारदारांना परत मिळवून देण्यात आले आहेत.

या गुन्ह्यांचा तपासासाठी जिल्हा स्तरावर सायबर गुन्हे शाखा आणि पोलीस ठाणे स्तरावर विशेष पथकांची नेमणूक करण्यात आली आहे, ज्या माध्यमातून हरवलेल्या आणि चोरीला गेलेल्या मोबाईलचा शोध निरंतर सुरू असतो. मोबाईलचा नंबर आणि हँण्डसेटचा आयएमईआय नंबर शोध घेऊन हरवलेल्या आणि चोरीला गेलेल्या मोबाईलचा शोध घेतला जातो. मोबाईल फोन हरवल्यास अथवा चोरीला गेल्यास तत्काळ सीईआयआर पोर्टलवर तक्रार नोंदवावी, असे आवाहन रायगड पोलीस दलाच्या सायबर सेल विभागाने केले आहे.

केंद्र सरकारने मोबाईल चोरी किंवा हरवण्याच्या तक्रारींवर प्रभावीपणे कार्यवाही करण्यासाठी आणि गहाळ झालेले मोबाईल त्यांच्या मालकांना परत मिळवून देण्यासाठी https://www.ceir.gov.in हे ऑनलाईन पोर्टल विकसित केले आहे. या पोर्टलवर हरवलेल्या किंवा चोरीस गेलेल्या मोबाईलची ऑनलाईन तक्रार नोंदवता येते. त्यानंतर पोलीस विभागाकडून तांत्रिक पद्धतींनी मोबाईलचा शोध घेऊन तो संबंधिताला परत केला जातो.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी

## प्रभागरचना प्रक्रियेसाठी अडीच महिन्यांचा कालावधी अपेक्षित

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील सर्व २९ महानगरपालिका, २५७ नगरपालिकांमध्ये प्रभागांची रचना करून ती राज्य निवडणूक आयोगाकडे मान्यतेसाठी सादर करावी, असा आदेश नगरविकास विभागाने सर्व पालिकांना दिला आहे. यानंतर पुढील संपूर्ण प्रक्रिया होऊन प्रभागांची अंतिम रचना जाहीर होण्यासाठी किमान अडीच महिने लागू शकतात.

राज्यातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार राज्य सरकारने तयारी सुरू केली आहे. सर्व महानगरपालिका, नगरपालिकांच्या प्रभागांची रचना करून ती राज्य निवडणूक आयोगाकडे मान्यतेसाठी सादर करण्याचा आदेश नगरविकास विभागाने मंगळवारी दिला. मुंबईत २२७ प्रभागांची संख्या कायम ठेवण्यात आली आहे. मुंबई वगळता अन्य महापालिकांमध्ये चार सदस्यीय, तर नगर परिषदांमध्ये दोन सदस्यीय प्रभाग पद्धत ठेवण्यात येणार आहे. याशिवाय नगरपंचायतीमध्ये प्रत्येक सदस्यास एक प्रभाग निश्चित करण्यात यावा, असे आदेशात म्हटले आहे. महापालिकांमध्ये अपवादात्मक स्थितीत प्रभाग तीन किंवा पाच सदस्यांचा, तर नगर परिषदांमध्ये अपवादात्मक स्थितीत तीन सदस्यीय प्रभाग असू शकतो.

अ, ब, क वर्ग महापालिकांतील प्रभागरचनेचे प्रारूप ठरवण्याची जबाबदारी महापालिका आयुक्तांकडे असेल, तर ड वर्ग महापालिकांसाठी जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार असेल. याखेरिज नगर परिषद व नगरपंचायतींच्या प्रभागरचनेचे अधिकार मुख्याधिकाऱ्यांकडे असणार आहेत.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी सरकारने प्रभाग रचनेचे आदेश जारी केल्यामुळे निवडणूक प्रक्रियेला अधिकृत स्वरूप प्राप्त झाले असून नागरिकांना लोकप्रतिनिधी निवडण्याची संधी मिळणार आहे.

### असे असतील विविध टप्पे

आयुक्तांनी प्रभाग रचना तयार केल्यावर राज्य निवडणूक आयुक्तांकडे मान्यतेसाठी पाठवावे लागेल. निवडणूक आयोगाने मान्यता दिल्यावर प्रभागांचे प्रारूप जाहीर केले जाईल. त्यावर हरकती व सूचना मागविण्यात येतील. त्यावर सुनावणी करून प्रभागांची अंतिम रचना निवडणूक आयोगाकडे मंजुरीसाठी पाठविली जाईल. राज्य निवडणूक आयोगाने मान्यता दिल्यावर प्रभागांची अंतिम रचना जाहीर केली जाईल. त्यानंतर आरक्षणाची सोडत काढली जाईल आणि निवडणुका ऑक्टोबरमध्ये होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## निवडक

### भंगार मालाची चोरी

**पनवेल :** गोडाऊनचे शटर उचकटून दोन लाख ३९ हजार रुपयांचा कॉपर आणि अल्युमिनियम भंगारची चोरी केल्याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात सहा जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. मोहम्मद खान याचा धानसर गांव येथे भंगार खरेदी विक्रीचा व्यवसाय आहे. त्याने कंपन्यांकडून कॉपर आणि ॲल्युमिनियमचे भंगार घेतले होते. त्यांच्या गोडाऊन मधून दोन लाख ३९ हजार रुपयांचे भंगार चोराने चोरून नेले.

### तलावात आढळला महिलेचा मृतदेह

**पनवेल :** उलवे परिसरातील असलेल्या तलावातील पाण्यामध्ये एका महिलेचा मृतदेह आढळून आला असून तिच्या नातेवाईकांचा शोध उलवा पोलीस करीत आहेत. मयत महिलेचे वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे, केस लहान काळे (विखुरलेले), डोळे उघडया स्थितीत, तोंड उघडे व जीभ बाहेर आलेली, चेहरा गोल, बांथा मध्यम, नेसणीस गडद निळा कुर्ता, लाल पायजमा आणि डाव्या पायात एक निळी स्लिपर घातलेली आहे. या महिलेबद्दल कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी उलवे पोलीस ठाणे (८६६९७८९१००) किंवा सहा. पोलीस निरीक्षक अजित कणसे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### ट्रकमधून मोबाईलची चोरी

**पनवेल :** तालुक्यातील साईकृपा धाब्याच्या समोर सर्व्हिस रोडवर ट्रकमध्ये झोपलेल्या व्यक्तीच्या मोबाईलची चोरी अज्ञात चोरट्याने केल्याची घटना घडली आहे. विशाल कुमकर (वय ३३) हे ट्रक मध्ये झोपलेले असताना कोणी तरी अज्ञात चोरट्याने त्याच्या खिशातील ८,००० रुपये किमतीचा विवो कंपनीचा फोन चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### पक्षीप्रेमींकडून कबुतराला जीवदान

**पनवेल :** वडाला बांधलेल्या धाग्यात पाया अडकून पडलेल्या कबुतराला पक्षीप्रेमी दिलीप कोकाटे यांनी जीवदान दिले



आहे. वटपौर्णिमेच्या निमित्ताने वडाच्या झाडाला बांधलेल्या धाग्यात एका कबुतराचा पाय अडकून तो हालहाल करत होता. ही दुर्दशा पक्षीप्रेमी दिलीप कोकाटे यांच्या लक्षात येताच त्यांनी तात्काळ त्या ठिकाणी जाऊन तिथे असलेल्या पुष्पा आवटे यांना सोबत घेऊन धागा सोडवला आणि त्या कबुतराला जीवदान दिले. दिलीप कोकाटे यांनी संयम, काळजी आणि माया दाखवत कबुतराला सुरक्षितरीत्या मुक्त केले. नागरिकांनी त्यांच्या या कृत्याचे कौतुक केले असून, धार्मिक कार्य करताना निसर्ग आणि प्राणिमात्रांची काळजी घेण्याचे महत्त्वही या घटनेतून अधोरेखित झाले आहे.

# सायबर क्राईम जनजागृती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



सायबर गुन्हेगारीही नवनवीन तंत्रज्ञानाच्या शोधाचा एक प्रमुख दुष्परिणाम आहे जागतिक समस्या आहे. अशा गुन्ह्यांत मोठ्या संख्येने महिला बळी पडतात. त्यांच्या पूर्ण सुरक्षिततेला धोका आहे, मात्र अशा प्रकारच्या सायबर गुन्ह्यांचा सामना करण्यासाठी कठोर कायदे करणाऱ्या मोजक्या देशांमध्ये भारताचा समावेश आहे. एकूण सायबर गुन्ह्यांपैकी मोठ्या संख्येने गुन्हे हे केवळ महिलांच्याच बाबतीत घडत असतात.

सायबर गुन्हे विशेषकरून हॅकिंग, प्रताधिकारभंग, बाल लैंगिक चित्रण इत्यादी स्वरूपात घडताना दिसतात. याशिवाय खासगी किंवा गोपनीय माहिती चोरणे, फोडणे आदी प्रकारदेखील सायबर गुन्ह्यांमध्ये मोडतात. माहिती तंत्रज्ञानाच्या प्रसाराबरोबर सायबर गुन्ह्यांमध्ये लक्षणीय वाढ होताना आढळत आहे. यासाठी सायबर क्राईम जनजागृती कार्यक्रम राबवण्यात आला.

महिलांना सामना करावा लागत असलेले सायबर गुन्हे ई-मेलद्वारे होणारा छळ, सायबर स्टॉकिंग (सायबर विश्वातून होणारा पाठलाग). आपल्या देशातील सायबर स्टॉकिंगबाबतची वास्तविकता जाणून घेणाऱ्या काही प्रातिनिधिक घटना सायबर पोर्नोग्राफी (सायबर विश्वातून पसरविली जात असलेली अश्लिलता) सायबर डीफमेशन (बदनामी), मॉर्फिंग (संगणकाच्या माध्यमातून इंटरनेटवरील मजकूरामध्ये किंवा छायाचित्रांमध्ये फेरफार करणे), ई-मेल स्फुफिंग (ईमेलद्वारे होणारे विडंबन/टवाळी) इत्यादी आहेत.

सायबर क्राईमच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिक ते एखाद्या देशाची सर्व प्रकारची व्यवस्था ढासळू शकते, इतकी त्याची व्याप्ती व आवाका गंभीर स्वरूपाचा आहे. आज जगातील प्रत्येक क्षेत्र, व्यवसाय, इंटरनेटने प्रभावित झालेला दिसतो. इंटरनेटच्या या मायाजालाचा हॅकर अतिशय क्लुप्तीने गैरवापर करतात. करंजाडे नोडमधील नागरिकांच्या सुरक्षितेसाठी विनाशुल्क सायबर क्राईम जनजागृती कार्यक्रम करंजाडेतील नागरिकांनी आयोजित केला होता.

यासाठी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मार्गदर्शन सुरू असताना अनेक नागरिकांनी प्रश्न विचारण्यात आले आणि त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. येणाऱ्या काळात सामाजिक संस्थांनी एकत्र होऊन जनजागृती करणे आवश्यक आहे. या कार्यक्रमासाठी चंद्रकांत गुजर, सहकार भारती सचिव किरण शिंदे, यांच्यासह अनेकांनी उपस्थिती दर्शवली.

# उघड्या गटारांवर बसवली झाकणे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



प्रभाग क्रमांक १७ मधील अनेक उघड्या गटारांवर पनवेल महानगरपालिकेमार्फत सिमेंटची झाकणे बसविण्यात आली आहे. या कामी भाजप अनुसूचित जाती मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष रावसाहेब खरात आणि नवनाथ नगर स्थानिक भाजप कार्यकर्त्या जरीना शेख यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पाठपुरावा केला होता.

नवनाथ नगर वसाहत पनवेल महापालिकेने गल्ल्यांमध्ये गटारे बांधली स्थानिक नागरिकांसाठी चांगले काम केले, परंतु बांधलेली गटारे खुली असल्यामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, महिला रात्रीच्या वेळी अंधारात पाय घसरून गटारात पडत होते. ही बाब रावसाहेब खरात यांना जरीना शेख आणि नागरिकांकडून समजली. त्यांच्याकडून ही समस्या ऐकून रावसाहेब खरात यांनी स्वतःगटाराची पाहणी केली व पनवेल महापालिकेकडे पाठपुरावा केला. त्यानुसार पनवेल महानगरपालिका बांधकाम विभागाने ताबडतोब दखल घेत नवनाथ नगर वसाहत पनवेल येथे गल्ल्यांमधील उघड्या गटारांवर सिमेंटची झाकणे टाकण्यास सुरुवात केली.

नागरिकांनी आमदार प्रशांत ठाकूर, माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार, मनोज भुजबळ, अजय बहिरा, माजी नगरसेविका सुशिला घरत, वृषाली वाघमारे व रावसाहेब खरात, जरीना शेख यांचे आभार मानले आहेत.



**श्रीरामपूर : रयत शिक्षण संस्थेच्या अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर येथील ज्युनिअर कॉलेजच्या नूतन इमारत उद्घाटन समारंभाच्या पूर्वसंध्येला कोपरगाव येथील प्रा. अरुण कदम, उद्योजक महेंद्र काळे, सेवानिवृत्त उपविभागीय अभियंता श्री. भास्कर, श्री. सुरळे, भाजप कार्यकर्ते अरविंद संवतसरकर यांनी 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेत त्यांचा सत्कार केला. जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख सोबत होते. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कोपरगाव, राहता परिसरातील रयत शिक्षण संस्थेच्या कार्याविषयी आणि अडीअडचणींबाबत सविस्तर चर्चा केली. दरम्यान, श्री संत हरिभाऊ विद्यालय पांगरी बुद्रुक येथील शालेय समितीचे पदाधिकारी विठ्ठल पगार, संदीप शिंदे, सुनील निरगुडे, विलास पगार, राजेंद्र काकड यांनीही लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेत विविध विषयांवर चर्चा केली.**



**उरण : भारतीय जनता पक्ष उत्तर रायगड उपाध्यक्ष जितेंद्र पाटील यांना वाढदिवसानिमित्त आमदार महेश बालदी यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप नेते रवी भोईर, महिला मोर्चा अध्यक्ष राणी म्हात्रे, माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, तालुका उपाध्यक्ष विजय पाटील, पागोटे गाव उपाध्यक्ष प्रवीण पाटील, भाजप नेते जीवन गावंड, निलेश म्हात्रे, रवी पाटील, किरण पंडित, कुंदन पाटील, संतोष पाटील, अतिश पाटील, निलेश पाटील, प्रदीप पाटील, जासई गाव अध्यक्ष शमिता ठाकूर, तालुका उपाध्यक्ष विजय पाटील आदी उपस्थित होते. सर्वांनी जितेंद्र पाटील यांचे अभीष्टचिंतन केले.**

# आगीमध्ये ट्रकचा पुढील भाग जळाला

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

करंजाडे रेल्वेफाटकाच्या वरील हायवेवर ट्रकला दहा जून रोजी रात्रीच्या सुमारास आग लागली. या आगीत ट्रकचा पुढील भाग जळाला आहे. अग्निशामक दलाने ही आग विझवली.

१० जून रोजी रात्री सव्वा नऊ ते साडेनऊच्या दरम्यान ट्रक (एमएच ४३ वाय ७३३१) या वाहनाला आग लागली. या आगीची माहिती पनवेल अग्निशामक दलाला देण्यात आली. घटनास्थळी अग्निशामक दल पोहचले. या आगीवर होजरील होजच्या सहाय्याने पाणी मारून ही आग विझवण्यात आली. यावेळी या आगीत ट्रकचा पुढील भाग जळून खाक झाला. सुदैवाने यात



कोणतीही जीवित हानी झाली नाही, मात्र ट्रकचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

# टँकरची कारला धडक, दोघे जखमी

**पनवेल :** टँकरने कारला दिलेल्या धडकेत कारमधील दोघेजण जखमी झाले. या अपघाताप्रकरणी टँकर चालकाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. डोंबिवली येथील प्रभाकर भामा जाधव हे त्यांची पत्नी सजिथा आणि इतर अशा पाच जणांसह ६ जून रोजी कारने कार्यक्रमासाठी जात होते. मुंब्रा-पनवेल हायवेवरील आरएएफ सिग्नलच्या पाठीमागे ते थांबले. या वेळी दुसऱ्या बाजूने विरुद्ध दिशेने टँकर वेगाने त्यांच्या पाठीमागे आला आणि त्यांच्या गाडीला पाठीमागून धडक दिली. जाधव यांची गाडी बाजूला उभे असलेल्या गाडीला जाऊन धडकली. त्यावेळी टँकर चालकाला दिसत नाही का असे बोलले असता त्याने शिवीगाळी केली आणि हातातील रॉड घेऊन खाली उतरला आणि त्यानंतर टँकर चालक व क्लिनर पळून गेले. अपघातात प्रभाकर जाधव आणि त्यांची पत्नी सजीथा ह्या जखमी झाले.

# 'सीकेटी'च्या प्राध्यापकांचा कोलंबो येथे बहुशाखीय आंतरराष्ट्रीय परिषदेत यशस्वी सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्रीलंकेतील कोलंबो येथे बहुशाखीय आंतरराष्ट्रीय परिषद झाली. आय.सी.बी.टी. कॅम्पस,कोलंबो व जे.जे.टी. विद्यापीठ, राजस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने आणि जे. वाटुमल साधुबेला गर्ल्स कॉलेज, उल्हासनगर यांच्या सहकार्याने घेण्यात आलेली बहुशाखीय आंतरराष्ट्रीय परिषद आय. सी.बी.टी. कॅम्पस,कोलंबो, श्रीलंका येथे झाली.




या परिषदेत चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज मधील डॉ. रत्नप्रभा म्हात्रे, इतिहास विभागप्रमुख यांनी 'दुबईज् रोल ॲज ए मॉडेल ऑफ हिस्टॉरिकल अँड इकोनॉमिक ट्रान्सफॉरमेशन: ए रिसर्च स्टडी' या विषयावर शोधनिबंध सादर केला तर डॉ. स्मिता भोईर, ग्रामीण विकास यांनी 'इंडिअन रुरल कल्चर-स्पेशल स्टडी ऑफ रायगड डिस्ट्रिक्ट इन महाराष्ट्रा, इंडिया' या विषयावर शोधनिबंध सादर केला आणि प्रा. भावेश भोईर, इतिहास विभाग यांनी 'ए रिसर्च स्टडी ऑफ इम्पॅक्ट ऑफ एक्सेसीव्ह युज ऑफ सोशल मिडिया ऑन कॉलेज स्टुडंटस् इन पनवेल तालुका' या विषयावर आभासी माध्यमातून शोधनिबंध सादर केला. या परिषदेत ऑनलाईन व ऑफलाईन माध्यमाद्वारे ९० शोधकर्त्यांनी शोधनिबंधांचे मौखिक सादरीकरण केले. या परिषदेचे प्रसारण फेसबुक लाइव्ह व श्रीलंका येथील दूरदर्शन वाहिन्यांवर प्रसारित करण्यात आले.

या बहुशाखीय आंतरराष्ट्रीय परिषदेत यशस्वी सहभाग घेतल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील व जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर आणि सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी सहभागी प्राध्यापकांचे अभिनंदन केले.

# एसीत शॉर्टसर्किटमुळे सेल्स ऑफिसमध्ये आग

**पनवेल : वार्ताहर**

एसीला शॉर्ट सर्किट मुळे आग लागून सेल्स ऑफिस आगीच्या भक्षस्थानी गेल्याची घटना पळस्पे फाटा येथील साई वर्ल्ड सिटी इमारतीच्या आवारात घडली आहे.

पळस्पे फाटा येथे साई वर्ल्ड सिटी ही मोठी इमारत आहे. या इमारतीच्या आवारात सेल्स ऑफिस आहे. या ऑफिसमधील एसीजवळ सकाळी साडे नऊच्या सुमारास शॉर्ट सर्किट झाले. या शॉर्ट सर्किटमुळे ऑफिसला आग लागली. या आगीचे वृत्त पनवेल महानगरपालिकेच्या पनवेल आणि नवीन पनवेल अग्निशमन दलास समजली. त्यांनी तातडीने त्या ठिकाणी धाव घेतली. तेव्हा स्मोक व्हेंटिलेशन होण्याकरता तडा गेलेल्या काचा तोडण्यात आल्या. अग्निशमन बंबाच्या सहाय्याने ही आग आटोक्यात आणण्यात आली.

यासाठी नवीन पनवेल येथील उप अग्निशमन अधिकारी अतुल सकपाळ, अग्निशमन विमोचक प्रमुख मंदार म्हात्रे, यंत्र चालक श्रीकांत आढाऊ, अग्निशामक अविनाश भालेराव,विशाल राऊत, प्रतिक गाडगे, पल्लवी जागले, पनवेल अग्निशमन दलाचे वैभव ओंबासे, मन्सूर, सुदीप ठाकूर, तनय पडवळ, कृष्णा नरवटे, एकनाथ बागूल, मितेश तारेकर आदींनी प्रयत्न केले.



# महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशन रायगड जिल्हा अध्यक्षपदी ॲड. हिरवे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशनचे रायगड जिल्हा अध्यक्ष म्हणून नवीन पनवेल येथील ॲड. तथा पब्लिक नोटरी वकील नागेश अरविंद हिरवे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र ॲण्ड गोवा नोटरी असोसिएशनचे अध्यक्ष सय्यद सिकंदर अली, असोसिएशनचे कार्यकारी अध्यक्ष ॲड. यशवंतराव खराडे तसेच सचिव ॲड. प्रवीण नलावडे यांच्या सहीचे नियुक्तीपत्र ॲड. नागेश हिरवे यांना देण्यात आले आहे.



ॲड. हिरवे हे रायगड जिल्ह्यात २०१२ पासून वकिली व्यवसाय करीत आहे. तसेच ते विधी सेवा समिती, पनवेलच्या पॅनलवर कार्यरत असून अनेक गरीब आणि गरजू लोकांना मोफत न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी सहकार्य केले आहे. तसेच पर्यावरण क्षेत्रात त्यांचे कार्य चालू आहे.

नुकतीच केंद्र सरकारतर्फे संपूर्ण भारतात मोठ्या संख्येने नवीन नोटरी वकिलांची नियुक्ती झाली आहे, परंतु तांत्रिक अडचणीमुळे बऱ्याच नवनियुक्त नोटरी वकिलांना त्यांचे नोटरी लायसन मिळवण्यासाठी अडचणी येत होत्या. या तांत्रिक अडचणी सोडवून संपूर्ण महाराष्ट्रातील बऱ्याच नवनियुक्त नोटरी वकिलांना नोटरी लायसन मिळवून देण्यासाठी ॲड. नागेश हिरवे यांनी विशेष प्रयत्न केले आहेत.

भविष्यात जुन्या व नवीन नोटरी बांधवांना नोटरी सेवा देताना येणाऱ्या अडीअडचणी तसेच या क्षेत्रातील विविध प्रलंबित प्रश्न, समस्या महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशनच्या माध्यमातून केंद्र सरकारपर्यंत मांडून त्या मार्गी लावण्याचे काम करणार असल्याचे ॲड. हिरवे यांनी सांगितले. त्यांच्या नियुक्तीबद्दल पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले.

## संपादकीय

# ट्रम्प अधिक आक्रमक

अमेरिकेतील ट्रम्प प्रशासनाच्या स्थलांतरितविरोधी धोरणाला पहिला विरोध कॅलिफोर्निया राज्यातील लॉस एंजलिस शहरात झाला असला तरी आता तो अमेरिकेतील अनेक शहरांमध्ये पसरतो आहे. या निदर्शकांच्या विरोधातील पोलिस कारवाई पुरेशी नाही असे म्हणत ट्रम्प यांनी लॉस एंजलिसमध्ये केंद्रीय निमलष्करी दल 'नॅशनल गार्ड्स' धाडले. या निर्णयाला स्थानिक पोलिस आणि प्रशासनाचा विरोध असतानाही ट्रम्प यांनी आक्रमक पवित्रा कायम ठेवल्यामुळे कॅलिफोर्नियाचे गव्हर्नर गॅव्हिन न्यूसम यांनी ट्रम्प यांच्या या निर्णयाविरोधात खटला दाखल केला आहे.

**कशाचीही पर्वा न करता अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लॉस एंजलिसमध्ये केंद्रीय नॅशनल गार्ड्स सोबत मरिन्स हे सैन्यदल पाठवण्याचाही निर्णय घेतला आहे. ट्रम्प यांच्या स्थलांतरितांच्या विरोधातील कारवाईला निदर्शकांकडून कायदेशीर मार्गाने विरोध सुरू होता. पण या निदर्शकांना रोखण्यासाठी ट्रम्प यांनी निमलष्करी दल व सैन्यदल पाठवले व तसे करताना त्यांनी कॅलिफोर्नियाच्या गव्हर्नरलाही विश्वासात घेतले नाही. त्यामुळे दोघांमधील संघर्षाला आता वेगळेच वळण लागण्याची चिन्हे आहेत. अमेरिका हा देश अनेक राज्यांचा संघ आहे. अमेरिकेच्या राज्यघटनेने राज्यांना अनेक अधिकार बहाल केले आहेत. ट्रम्प यांच्या सैन्यदले धाडण्याच्या निर्णयाकडे त्यामुळे राज्यांची स्वायत्तता डावलणारा निर्णय म्हणून पाहिले जात आहे. अशातच ट्रम्प यांच्या स्थलांतरितविरोधी कारवाईला होत असलेला विरोध आता अमेरिकेतील अनेक बड्या शहरांमध्येही पसरू लागला आहे. न्यूयॉर्क शहर, सॅनफ्रान्सिस्को, डलास, ऑस्टिन, बोस्टन, अटलांटा, शिकागो, पिट्सबर्ग, लास वेगास, मिनिआपोलीस अशा अनेक शहरांमध्ये आता निदर्शने सुरू झाली असून सर्वत्र आंदोलकांची धरपकड केली जाते आहे. स्थलांतर विभागाच्या अधिकाऱ्यांनी लॉस एंजलिसमध्ये ४० बेकायदा स्थलांतरितांना ताब्यात घेतल्यानंतर तेथे आंदोलन सुरू झाले होते. ट्रम्प हे मुळातच स्थलांतरितविरोधी भूमिकेमुळेच मोठ्या मताधिक्याने पुन्हा अध्यक्षपदी निवडून आले आहेत. बेकायदा स्थलांतरितांविरोधात कठोर धोरण राबवून त्यांना मायदेशी परत पाठवण्यासाठी ते अनेक उपाययोजना राबवित आहेत. अमेरिकेतील गुन्हेगारी, बेरोजगारी या साऱ्या समस्यांना बेकायदा स्थलांतरित जबाबदार असल्याची ट्रम्प यांची ठाम भूमिका आहे. अमेरिकेला वेगाने पुन्हा महान बनवायचे असल्यास या बेकायदा स्थलांतरितांविरोधात कठोर भूमिका घ्यायलाच हवी यावर ट्रम्प ठाम आहेत. परंतु काही राजकीय विश्लेषकांच्या मते पुढील वर्षी अमेरिकेत मध्यावधी निवडणुका असल्याने आपल्या पारंपरिक मतदारांना खुश ठेवण्यासाठी ट्रम्प प्रशासनाकडून या मोहिमा राबवल्या जात आहेत. परंतु तसे करताना राज्यांच्या प्रशासनाला विश्वासात न घेणे मात्र ट्रम्प यांना अडचणीत आणणारे ठरू शकते. स्थलांतरितविरोधी कारवाईच्या विराधात निदर्शने करणारे सशस्त्र बंडखोर म्हणजेच इन्सरेक्शनिस्ट आहेत. त्यामुळे त्यांच्या विरोधात नॅशनल गार्ड्सना धाडण्याचे विशेषाधिकार आपल्याला राष्ट्राध्यक्ष म्हणून आहेत अशी भूमिका यासंदर्भात ट्रम्प यांनी घेतली आहे. बहुतेक बड्या शहरांमध्ये ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाचे नियंत्रण नाही. त्यामुळे अनेक ठिकाणी स्थानिक प्रशासनाशी ट्रम्प यांचा संघर्ष होणार असे दिसते आहे. आपल्या धोरणाला विरोध करणारे हे राजकीय विरोधक राष्ट्रविरोधी आहेत अशी भूमिकाही ट्रम्प आणि त्यांच्या प्रशासनातील काही सहकाऱ्यांनी घेतली आहे. अमेरिकेच्या स्थलांतरितविरोधी धोरणाची झळ शिक्षणासाठी तेथे जाऊ इच्छिणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांनाही बसते आहे. सध्या अमेरिकेत बरेच काही बदलताना दिसते आहे. हे बदल अमेरिकेसारख्या बड्या लोकशाहीला नेमक्या कुठल्या दिशेने घेऊन जातात हे येणारा काळच स्पष्ट करील.**

# पोटापासून पोटापर्यंत



एक तरुणी आपल्या आई आणि सासूबाईला विचारते हे बघ न बाळ कधीचे रडत आहे. या दोन्ही आई सांगतात, अगं बघ जरा त्याचे पोट खराब असेल म्हणून रडत असेल. जरा त्याला ग्राइफ वॉटर दे म्हणजे त्याचे पोट साफ होईल. तू लहान असताना मी तुला हेच देत होती. असे शब्द आपण जाहिरातेद्वारे ऐकले आहेत. म्हणजे नवजात बाळाचे पोट चांगले असणे गरजेचे आहे.

पोट, ज्याला जठर किंवा आमाशयदेखील म्हणतात. हे मानवी पाचक संस्थेतील एक महत्वाचे अवयव आहे. हे अन्न पचवण्यासाठी एक स्नायुयुक्त, पोकळ अवयव आहे आणि अन्ननलिके (ग्रासनली) आणि लहान आतड्याच्या दरम्यान स्थित असते. पोटाचे कार्य अन्नाचे पचन, पाचक रसांचे उत्पादन, रोगजंतूंचा नायनाट हे असत. हे झाले जीवशात्र किंवा आरोग्यशात्र मध्ये पोट म्हणजे काय? याउपरही पोटाविषयी बरंच काही बोलल्या जात असत हे आपल्या जीवनात आढळत असत.

माणसाचे संपूर्ण आयुष्य हे पोट कसे भरता येईल? यावरच संपून जात. जरा आपण १८ वर्षाचे झालो की, आपल्याला आपल्या भविष्याची चाहूल लागून जाते आणि आपलं सुरु होऊन जात चला पोटापाण्यासाठी काही तरी करावे लागेल. आपल्या कुटुंबातच आपल्याला लहानपणापासून आढळून येत की, आपले आई-वडील आपल्या कुटुंबासाठी राब-राब राबत असतात. त्यांचा संपूर्ण जीवनाचा संघर्ष हा कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी असतो.

आपल्याला पोट आहे, त्यात भूक आहे म्हणून हा माणसाचा संघर्ष आहे. जर पोट नसतं, अर्थात भूक लागली नसती तर माणसाने काहीच केलं नसतं. त्याला कशाचीच ओढ नसती, कशाचीच गरज वाटली नसती. तो एकदमच निश्चिन्त राहिला असता. तो एकदमच आळशी झाला असता, त्याने काहीच केले नसते, ना कामधंदा, ना कष्ट, ना मेहनत.

पोटापाण्यासाठी माणूस शेती कामापासून तर काही पण उद्योगधंदे केवळ आपल्या उदरनिर्वाहासाठी करीत असतो. अपार मेहनत हा माणूस करत असतो. ह्यात मग सन्मानाचा रोजगार असो की कुठल्याही स्तरावरचा रोजगार असो तो आपला जीव ओतून करीत असतो.

आपला देश हा कृषिप्रधान देश आहे. तरी पण हा अन्नधान्याने समृद्ध झाला नव्हता. देश स्वातंत्र्य झाला तेव्हा प्रथम प्राथमिकता आपल्या देशाची अन्नधान्य होती. आपली पहिली पंचवार्षिक योजना ही कृषी उत्पन्न वाढवण्यावर होती. हिला हरितक्रांती म्हणून संबोधिले गेले. विशेष म्हणजे ही पहिली हरितक्रांती आपल्या देशाची यशस्वी झाली. देश अन्नधान्याने समृद्ध झाला.

आपल्या देशाने बरेच दुष्काळ सुद्धा बघितले आहेत. आपल्या देशात अन्नधान्याचा तुटवडा होता. खायला मुबलक अन्नधान्य नव्हतं. देशाच्या पंतप्रधानांनी एकवेळ उपाशी राहण्याचे आवाहनसुद्धा केलं होत.

एक वेळ अशी होती की खायला मिळत नव्हतं. देशाचे काही भाग कुपोषित होते. पोट पाठीला टेकलं होत. तेव्हा संघर्ष असा होतो की, पोट वाढले पाहिजे, पोटाचा आकार वाढला पाहिजे. पोटाचा आकार वाढणे, ढेरी वाढणे म्हणजे समृद्धीचं लक्षण वाटत होत. त्याला खात्यापित्या घरचं संबोधिले जायचं. त्याला शेठ म्हणून संबोधायचे. जो तो लठ्ठ तंदुरुस्त होण्यासाठी संघर्ष करीत होता. सुदृढ बालक होण्यासाठी धडपड केल्या जात होती. तेव्हा एव्हढे पदार्थ सुद्धा नव्हते. खाण्यासाठी प्रतिक्षा करावी लागे.

अगोदरच्या काळी व्यायामाला तेव्हढं महत्व दिल्या जात नसे किंवा तेव्हढी जागरूकता सुद्धा नव्हती. त्याकाळी ऐषोआरामाचे साधनेसुद्धा नव्हती. सकाळी कामे स्वतः करणे, पायी जाणे, फिरणे, सायकलीने जाणे. महिलांचे सगळी कामे शरीर कष्टाची होती. पुरुष पण अंग मेहनतीचे कामे करत. त्यामुळे त्यांची चरबी ही पूर्णतः जळून जात असे व लठ्ठपणा पोट सुटलेले नसायचे. तेव्हा बी.पी., शुगर व हृदयरोग नसायचे. अंग मेहनतीमुळे सगळी चरबी जळत असे व शरीरावर अतिरिक्त मास आढळत नसे. आता तर एव्हढी चरबी वाढली आहे की दवाखान्यात डॉक्टरला आपल्या हाताची नससुद्धा सलाईनसाठी सापडत नाही.

आता आरामदायी जीवन झाले आहे. कष्टाची कामे कमी झाली आहेत. सर्व कामे ही यंत्राद्वारे केली जातात. त्यामुळे बैठे जॉब वाढलेले आहेत व त्याचा परिणाम म्हणून माणसाच्या अंगात चरबी वाढली आहे. स्थूलपणा, लठ्ठपणा वाढला आहे. जिकडे-तिकडे लोकांचे पोट सुटलेले दिसत आहे, वाढलेले आहे आणि या स्थूलपणामुळे बरेचसे आजार बळकावले जात आहे. एव्हढेच नाही तर हा स्थूलपणाच हल्ली रोगांचे माहेरघर झाले आहे. ह्यामुळे बी.पी., शुगर, हृदयरोग आणि गुडघे दुखी जास्त प्रमाणात बळावली आहे.

आता सर्व डॉक्टर्स सर्वांना वजन न वाढू देण्याचा सल्ला देत आहेत. वजन कमी करा असा सल्ला देतात. आता जो तो वजन कमी करण्याच्या मागे लागला आहे. प्रत्येकजण जिम, यु ट्यूब, योगा व झुंबा डान्स करण्याकडे आपला मोर्चा वळवतात आहे. जणू काही वजन, चरबी, स्थूलपणा कमी करण्याची मोहीमच राबविली जात आहे. यात खाण्यावर नियंत्रण करण्यासाठी डॉक्टर सल्ला देत आहेत. प्रामुख्याने मीठ, तेल, साखर, मैदा, तळलेले पदार्थ व बेकरी पदार्थ न खाण्याचे सल्ले दिले जात आहे. चहा सोडायला आवर्जून सांगितले जात आहे. गोड तर अजिबात खाऊ नका असे सांगतात. हे जे काही पदार्थ आहेत ते आपल्यासाठी विष आहेत हे सांगितल्या जात आहे.

पुरुष आणि महिला वजन वाढू नये यासाठी अहोरात्र झटत आहेत. दोघांनाही वजन वाढणे म्हणजे एक प्रकारचे अपमानित व दोषी असल्यासारखे वाटते. महिला आपल्या फिगरवर अधिक लक्ष्य केंद्रित करीत आहे, जेणेकरून त्यांच्या सडपातळपणावर अवतीभोवतीचे लोक प्रभावित होतील. जरा का कोणी तू पातळ झाली, रोडावाली व वजन कमी झाले, आता छान दिसतेस म्हटल्यावर त्यांना स्वर्ग दोन बोट दूर असल्याचा आनंद होतो. त्यांना ही कमेंट तू सुंदर दिसतेस यापेक्षा ही चांगली वाटते. काय मेंटेन केले तू स्वतःला म्हटले की खेळ खल्लास.

असे आपण नेहमीच ऐकतो माणसाच्या पोटात दडलं तरी काय आहे? ज्याचा कधीच थांग पत्ता लागत नाही. नेहमी ह्याच्या पोटात खलबत चाललेली असतात. हे जेव्हा म्हणतात न आपण खतरे में आहोत. तेव्हा नक्कीच समजून जायचे की ह्याच्या पोटात काही तरी गडबड चालली आहे. एकतर हे कोणाचे तरी पोट फाडतील नाही तर ओकारी तरी करतील. नेहमी महिलांना बदनाम केलं जात की, ह्यांच्या पोटात काही राहत नाही. तर तसे अजिबात नाही. बघा आपण दवाखान्यात गेल्यावर डॉक्टर आपल्याला सर्वप्रथम नेहमी विचारतात पोट साफ आहे ना? मग पुढील इलाज सुरु करतात.

इकडे पुरुष मंडळीसुद्धा काही कमी नाहीत. आपल इम्प्रेशन जमविण्यासाठी आपलं पोट लपविण्याच्याच फिक्रीत असतात. एका काळ होता खायला मिळत नव्हतं म्हणून पोट नव्हतं तर आज एक काळ आहे पोट सुटले म्हणून पोट कमी करायचे आहे. शेवटी हा पापी पेटका सवाल है। थोडक्यात माणसाचा संघर्ष हा जन्मापासून तर मृत्यूपर्यंत पोटापासून पोटापर्यंत चालू असतो व तो माणसाच्या जीवनभर पोटावरच फिरत असतो. माणसाचे संपूर्ण जीवन हे पोटापासून तर पोटापर्यंतच घुटमळत असते असे म्हणणे काही वावगे ठरणार नाही.

**-अरविंद मोरे, नवीन पनवेल**



## बदलते तंत्रज्ञान

# एआय टूलसह बनवा रिअलिस्टिक व्हिडीओ

व्हीइओ-३ हे गुगल डीपमाइंडने तयार केलेले एआय व्हिडिओ जनरेशन मॉडेल आहे. ते मजकूर किंवा प्रतिमांमधून ८ सेकंदांचे उच्च-गुणवत्तेचे व्हिडिओ तयार करू शकते. व्हिडिओ तयार करण्यासोबतच संवाद, ध्वनी प्रभाव आणि संगीत तयार करण्याचे वैशिष्ट्य ते ओपन एआयच्या सोरा आणि रनवे एमएल सारख्या साधनांपेक्षा वेगळे बनवते.




उदाहरणार्थ, जर तुम्ही अल्बर्टातील जंगलातील आगींबद्दल एक न्यूज अँकर रिपोर्ट करतो असे टाइप केले तर व्हीइओ-३ केवळ न्यूज अँकरचा व्हिडिओ तयार करणार नाही तर त्याचा आवाज, ध्वनी प्रभाव आणि पार्श्वभूमी संगीत देखील जोडेल. हे व्हिडिओ 4K रिझोल्यूशनमध्ये तयार केले जातात, जे त्यांना अत्यंत वास्तववादी बनवते.

व्हीइओ-३ चा वापर गुगलच्या जेमिनी ॲप आणि फ्लो प्लॅटफॉर्मद्वारे करता येतो. फ्लो हे गुगलने क्रिएटर्ससाठी बनवलेले एक खास ॲप आहे. यामध्ये तुम्ही व्हिडिओला अधिक चांगल्या पद्धतीने कस्टमाइझ करू शकता. हे टूल मूड, टोन आणि सांस्कृतिक सेटिंग्ज समजून घेऊन सिनेमॅटिक व्हिडिओ तयार करते.

व्हडिओ तयार करण्यासोबतच संवाद, ध्वनी प्रभाव आणि संगीत निर्माण करण्याची सुविधा त्याला वेगळे बनवते.


व्हीइओ-३ आपले जीवन बदलू शकते?

व्हीइओ-३ चा वापर शिक्षण आणि प्रशिक्षणात देखील केला जाऊ शकतो. शाळा, महाविद्यालय आणि कॉर्पोरेट प्रशिक्षणासाठी वास्तववादी व्हिडिओ तयार करणे आता सोपे झाले आहे.

शिक्षक इतिहास, विज्ञान किंवा भूगोलावरील व्हिडिओ तयार करण्यासाठी व्हीइओ-३ वापरू शकतात. उदाहरणार्थ, शिक्षकाला दुसरे महायुद्ध बद्दल शिकवायचे असते. म्हणून, व्हीइओ-३ च्या मदतीने असे व्हिडिओ तयार करता येतात ज्यात सैनिक आणि रणगाडे दिसतात. हे पाहून मुलांना समजणे सोपे जाईल.

एका वैद्यकीय महाविद्यालयाने व्हीइओ-३ वरून एक शस्त्रक्रिया सिम्युलेशन व्हिडिओ तयार केला होता, ज्यामध्ये एक डॉक्टर ऑपरेशन करत होता. तो पाहून विद्यार्थ्यांनी व्यावहारिक ज्ञान मिळवले.

# लोकप्रिय लेखक पु.ल. देशपांडे



## निमित्त

मराठी भाषेने देशाच्या जडणघडणीमध्ये फार मोठा वाटा निर्माण केलेला आहे. महाराष्ट्राने प्रत्येक क्षेत्रामध्ये भारताला एक वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवण्यासाठी नेहमीच प्रयत्न केले आहे. यामध्ये साहित्य क्षेत्रदेखील मागे नाही. महाराष्ट्रामध्ये अनेक दिग्गज साहित्यकार होऊन गेले. ज्यांच्या साहित्य निर्मितीमुळे मराठी भाषा समृद्ध होण्याबरोबरच मराठी भाषेला आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवरील ओळख मिळण्यास देखील मदत झालेली आहे. असेच एक सर्वांच्या परिचयाचे व सर्वांचे लाडके लेखक म्हणून पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे म्हणजेच पु.ल. देशपांडे उर्फ भाई उर्फ पुल हे लोकप्रिय मराठी लेखक, नाटककार, नट, कथाकार व पटकथाकार, दिग्दर्शक आणि संगीत दिग्दर्शक होते.

पु. ल. देशपांडे यांचा जन्म ८ नोव्हेंबर १९१९ रोजी मुंबईतील गावदेवी या भागात झाला. पार्ले टिळक विद्यालयातून माध्यमिक शिक्षण पूर्ण करून पुल मुंबईतील इस्माईल युसुफ कॉलेजातून इंटर व सरकारी लॉ कॉलेजमधून एलएल.बी. झाले आणि कलेक्टर कचेरी व प्राप्तीकर विभागात काही काळ नोकरी करून पुण्याला आले. त्यापूर्वी ते पेट्रोल रेशनिंग ऑफिसमध्ये कारकून आणि ओरिएंटल हायस्कूलमध्ये शिक्षक होते. पुण्याला आल्यावर त्यांनी फर्ग्युसन कॉलेजमधून बी.ए.आणि नंतर एम.ए. केले.

१९३७ पासून नभोवाणीवर पुल मोठ्या नाटिकांत भाग घेऊ लागले. त्या वर्षी त्यांनी अनंत काणेकरांच्या 'पैजार' या श्रुतिकेत काम केले. २०१४ मध्ये प्रकाशित झालेले 'बटाट्याची चाळ' हे त्यांचे विनोदी पुस्तक प्रसिद्ध आहे. १९४८ साली पुल यांनी 'तुका म्हणे आता' हे नाटक आणि 'बिचारे सौभद्र' हे प्रहसन लिहिले. १९४७ ते १९५४ या काळात त्यांनी चित्रपटांमध्ये आणि चित्रपटांसाठी काम केले. 'वंदे मातरम', 'दूधभात' आणि 'गुळाचा गणपती' या चित्रपटांत अष्टपैलू कामगिरी केली. १९४७ सालच्या 'कुबेर' चित्रपटाला त्यांनी संगीत दिले.

पुल यांनी 'अंमलदार','गुळाचा गणपती','घरधनी','चोखामेळा', 'दूधभात', 'देव पावला', 'देवबाप्पा', 'नवराबायको', 'नवे बिर्हाड', 'मानाचे पान' आणि 'मोठी माणसे' या अकरा चित्रपटांचे संगीत दिग्दर्शन केले. याशिवाय ज्योत्स्ना भोळे, माणिक वर्मा व आशा भोसले यांच्याकडून भावगीते पुलंनी गाऊन घेतली १९५५ मध्ये पुल 'आकाशवाणी'त (ऑल इंडिया रेडिओत) नोकरीला लागले. त्यांनी अनेक श्रुतिका लिहिल्या आणि भाषणे दिली. ५६-५७ मध्ये ते आकाशवाणीवर प्रमुख नाट्यनिर्माता झाले. पु ल देशपांडे यांनी लेखन क्षेत्रामध्ये आपली कारकीर्द गाजवलीच, त्याचबरोबर त्यांनी नाटक क्षेत्रांमध्ये देखील मोलाचे कामगिरी केली आहे. सोबतच त्यांनी चित्रपटांमध्ये काम करत आपल्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा परिचय दिलेला आहे. त्यांनी एक उत्तम वक्ता हा किताब देखील मिरवला होता. पु. ल. देशपांडे यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. त्यामध्ये पद्मभूषण व पद्मश्रीचा समावेश आहे. अशा या लोकप्रिय लेखकाचे १२ जून २००० रोजी निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# तुम्हाला माहीत आहेत का लस्सी पिण्याचे फायदे?

उष्णतेचा त्रास झाला की आपण वेगवेगळे उपाय करतो मात्र तुम्हाला माहितीये का उष्णतेचा त्रास होत असेल तर लस्सीचे सेवन केलं जातं. गोड लस्सी प्यायल्याने पचनसंस्था मजबूत होते आणि पोट निरोगी राहते. गोड लस्सीमध्ये अनेक पोषक घटक असतात जे आपल्या पोटातील बद्धकोष्ठता आणि सिडिटीची समस्या सहज दूर करण्याचे काम करतात.गोड लस्सी शरीरासाठी खूप फायदेशीर आहे. कारण त्यात सोडियम, प्रथिने आणि फायबर भरपूर प्रमाणात असतात. ज्यामुळे पचनसंस्था मजबूत होण्याबरोबरच हाडेही मजबूत असतात. चला तर मग द्याची लस्सीचे फायदे आणि कृती पाहूयात..



**पचनक्रिया मजबूत ठेवण्यासाठी**

लस्सीचे सेवन केल्याने पचनक्रिया सुरळीत ठेवण्यासोबतच पचनक्रिया मजबुत होण्यासाठीही मदत होते. कारण यामध्ये मुबलक प्रमाणात बॅक्टेरिया असतात. जर तुम्हाला पोटाच्या समस्यांचा सामना करावा लागत असेल तर लस्सी त्यावर गुणकारी ठरते.

मसालेदार पदार्थ किंवा बाहेरी पदार्थ खाल्याने ॲसिडिटीच्या समस्येचा सामना करावा लागतो. उन्हाळ्यामध्ये ॲसिडीटीची समस्येचा त्रास आणखी वाढतो. लस्सी यावर अत्यंत परिणामकारक ठरते. लस्सी थंड असते त्यामुळे ॲसिडिटी, अपचन यांसारख्या समस्यांवर फायदेशीर ठरते.

हाडांसाठी फायदेशीर

लस्सीमध्ये कॅल्शिअम मुबलक प्रमाणात असतं. ज्यामुळे हाडांच्या मजबुतीसाठी ही फायदेशीर ठरते. हाडांच्या समस्या दूर करण्यासाठी दररोज लस्सी पिणं फायदेशीर ठरतं.

ब्लड प्रेशर कंट्रोलमध्ये ठेवण्यासाठी

लस्सी प्यायल्याने ब्लड प्रेशर कंट्रोलमध्ये राहतं. अनेक संशोधनांमधून ही गोष्ट सिद्ध करण्यात आली आहे की, लस्सीमध्ये असलेलं पोटॅशिअम आणि रिबोफ्लेविन यांसारखी तत्व ब्लड प्रेशर नैसर्गिक पद्धतीने कंट्रोल करतात.

बटरस्कॉच लस्सी कृती

प्रथम दोन कप ताजे दही, एक कप मलईदार दूध, तीन चमचे साखर,काही काजूचे तुकडे, चिमूटभर काळे मीठ आणि अर्धा कप बटर स्कॉच आइस्क्रीम घ्या.नंतर मिक्सर जार घ्या आणि सर्व साहित्य घाला आणि एकदा मिसळा. नंतर सर्व्हिंग ग्लासमध्ये फिरवून थंड थंड सर्व्ह करा.

# श्रीवर्धनच्या मध्यवर्ती प्रशासकीय भवनाला गळती





**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन शहरातील मध्यवर्ती प्रशासकीय भवनात पावसाळ्याच्या सुरुवातीलाच झालेली पाणीगळती ही केवळ एक तांत्रिक त्रुटी नसून, प्रशासनाच्या बांधकाम विषयक यंत्रणेतील हलगर्जीपणाचा ठळक नमुना आहे. २०१४ साली तत्कालीन पालकमंत्री सुनील तटकरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले होते. सुमारे पाच कोटी रुपयांच्या खर्चाने उभारलेली ही इमारत अवघ्या दहा वर्षांत जीर्णावस्थेला पोहोचल्याचे चित्र समोर आले आहे.

तहसीलदार महेंद्र वाकलेकर यांच्या दालनात भिंतींवर मोठ्या प्रमाणात ओलावा निर्माण झाला आहे. त्यामुळे त्यांच्या आसनमागील भिंतीवरील रंग निघून पडला असून, अनेक ठिकाणी प्लास्टर उखडलेले दिसत आहे. प्रांत कार्यालयातील कुळवहिवाट आणि भूसंपादन विभागात तर अक्षरशः गळतीमुळे कर्मचारी कामकाजाच्या ठिकाणी प्लास्टिकच्या बादल्या ठेवून पाणी गोळा करताना दिसून आले.

तळमजल्यावरील दर्शनी भागातही खांबाचे प्लास्टर मोठ्या प्रमाणात निखळलेले असून, एकंदरित ही संपूर्ण इमारत धोकादायक स्थितीकडे वाटचाल करत आहे. इतक्या मोठ्या रकमेचा निधी खर्च करून उभारलेली प्रशासकीय वास्तू अशी कोसळू लागल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

या इमारतीचे बांधकाम वाकडाई कन्स्ट्रक्शन या ठेकेदार कंपनीकडून करण्यात आले होते. त्यावेळी नागरिक आणि पत्रकारांनी कामाच्या निकृष्ट दर्जावर बोट ठेवले होते. तत्कालीन बांधकाम अभियंत्याकडे तक्रारी दाखल करण्यात आल्या होत्या. मात्र, त्या तक्रारी दुर्लक्षित करण्यात आल्याचे आता प्रकर्षाने जाणवत आहे.

२०२१ मधील निसर्ग चक्रीवादळानंतर इमारतीच्या पत्र्यांचे नूतनीकरण व रंगकामासाठी तब्बल २६ लाख रुपये खर्च करण्यात आला होता. तरीही या वर्षी अवकाळी पावसात छतावरून गळती सुरूच असल्याने शासनाने खर्च केलेले कोट्यवधी रुपये वाया गेल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

## चौक बाजारपेठेत पोलिसांची गस्त

**चौक : प्रतिनिधी**

चौक बाजारपेठ येथे बेशिस्त वाहन चालक, बेशिस्त वाहन उभे करणे आणि अनधिकृत फेरीवाले यांच्या मुळे कायम वाहतूक कोंडी होत असते. ही वाहतूक कोंडी आपल्यापरीने सोडविण्याचा प्रयत्न चौक पोलीस करीत असतात.आज चौक पोलिसांनी संपूर्ण बाजारपेठ मधून पायी गस्त घातल्याने बाजारपेठेने मोकळा श्वास घेतला.

रायगड जिल्ह्यात नव्याने दाखल झालेल्या जिल्हा पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांनी पायी गस्त घालण्याच्या पोलिसाना सूचना केल्या आहेत.त्याप्रमाणे आज पोलीस उप निरीक्षक विशाल पवार यांच्या मार्गदर्शनाखाली चाळीस गावच्या बाजार पेठेत पोलिसांनी पायी गस्त घातल्याने बाजार पेठेत आलेले ग्राहक,व्यापारी, नागरिक आणि बाजारेठेने मोकळा श्वास घेतला.


## पनवेल महानगरपालिका
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

### शहर अभियंता विभाग
### दरपत्रक

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता अंदाजपत्रक तयार करण्यासाठी खालील कामासाठी दरपत्रक (Market Rate) मागविण्यात येत आहेत.

| अनु.क्र | कामाचे नाव | मुदत |
|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये पायाभूत सोयी-सुविधेसाठी विविध तंत्रज्ञानाचा वापर शहराचे ३ D Model विकसीत करणे व भू-अंतर्गत सेवांचे Mapping करुन पायाभूत विकासासाठी सहाय्यभूत तांत्रिक संरचना तयार करणे. | १२/०६/२०२५ ते १८/०६/२०२५ (०७ दिवस) |

या कामाच्या दरपत्रकाबाबतची माहिती पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर दि. १२/०६/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. सदर बाबींचे बाजार भाव स्वतःच्या लेटरहेडवर महानगरपालिका कार्यालयात अथवा pmbandhkamdept01@gmail.com या ई-मेलवर मुदतीत पाठविण्यात यावे ही विनंती. सदर दर हे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी आहेत. याची कृपया नोंद घ्यावी.

जा.क्र :-पमपा/जनसंपर्क./३१२५/
प्र.क्र. २५१/२५३/२०२५
दिनांक :- ११/०६/२०२५

सही/-
( गणेश शेटे)
अतिरिक्त आयुक्त- ।
पनवेल महानगरपालिका


## माणगाव येथे जागतिक नेत्रदान दिवस साजरा




**माणगाव : प्रतिनिधी**

१० जून हा दिवस जागतिक नेत्रदान दिन म्हणून सर्वत्र साजरा करण्यात येतो. नेत्रदानाचे महत्त्व लक्षात घेऊन या दिनाचे औचित्य साधून माणगाव येथे मंगळवार ता.१० जून रोजी लायन्स क्लब ऑफ माणगाव यांच्या वतीने माणगाव एस .टी. स्थानक येथे जागतिक नेत्रदान दिन साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थितांना नेत्रदानाचे महत्व सांगण्यात आले. सुदृढ व्यक्तींनी नेत्रदानाविषयी सजग राहून दृष्टी नसलेल्या व्यक्तींना दृष्टी देण्यासाठी नेत्रदान महत्त्वपूर्ण असल्याचे यावेळी सांगण्यात आले. नेत्रदान चळवळीत सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले


## पेण नगर परिषद, पेण
### जाहीर निविदा

पेण नगरपरिषद, पेण हे निम्ननिर्देशित कामासाठी इच्छुक सनदी लेखापाल यांच्याकडून जाहीर निविदा दि. २३/०६/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) मागविणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचा तपशील | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी | मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | पेण नगरपरिषदेचे सन २०२४-२५ व २०२५-२६ या आर्थिक वर्षांचे लेखे द्विनोंद पद्धतीमध्ये तयार करून देणे. | ५०००/- | ५००/- | निविदा फॉर्म मध्ये नमूद केले नुसार, |

**अटी व शर्ती.**
१) वरील कामासाठीचे कोरे निविदा फॉर्म दि. १२/०६/२०२५ ते दि. २०/०६/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) रोख रक्कम रु. ५००/- भरल्यास नगरपरिषदेच्या लेखा विभागाकडे मिळू शकतील व या दरपत्रकामधील अटी संबंधितांवर बंधनकारक राहतील.
२) वरील कामाच्या निविदेसोबत राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (D. D.) जोडणे आवश्यक आहे. राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (D. D.) निविदेसोबत जोडले नसल्यास निविदा रद्द करणेत येईल.
३) वरील कामासाठीची निविदा भरण्याची अंतिम मुदत दि. २३/०६/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत आहे.
४) कोणतीही अट असलेली निविदा स्विकारणेत येणार नाही.
५) सदरची निविदा द्वीलिफाफा मध्ये सादर करण्यात यावी.
६) प्रथम लिफाफ्यामध्ये खालील कागदपत्रे असणे आवश्यक आहे.
१. फॉर्म फी व राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (D. D.)
२. पॅनकार्ड, जीएसटी प्रमाणपत्र
३. सनदी लेखापाल यांचे मेंबरशिप प्रमाणपत्र
४. सदर काम यापूर्वी केल्याचा अनुभव
५. प्रतिज्ञापत्र

ज्यांचे नावे निविदा मंजूर होईल त्यास शासनाचे नियमाप्रमाणे होणाऱ्या रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर रितसर करारनामा करून द्यावा लागेल. या कामाबाबतची अनुषंगिक माहिती नगरपरिषदेच्या लेखा विभागामध्ये कार्यालयीन कामाचे दिवशी व कार्यालयीन कामाचे वेळेत मिळू शकेल. कोणतीही अथवा सर्वच निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. मुख्याधिकारी, पेण नगरपरिषद, पेण यांचेकडे राहील. मुदतीत आलेल्या निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी सायंकाळी ५.३० वाजता नगरपरिषद कार्यालयात उपस्थित सनदी लेखापाल / त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष अथवा उपस्थित नसल्यास उघडण्यात येईल किंवा सोईनुसार उघडण्यात येईल.

जा.क्र/पेन/का.३/लेखा/२०२५/७१६
पेण नगरपरिषद कार्यालय, पेण
दिनांक:-१०/०६/२०२५

सही/-
(श्री. जीवन लक्ष्मण पाटील)
मुख्याधिकारी
पेण नगर परिषद, पेण


## शिवभक्तांकडून एसटी महामंडळ आणि कर्मचाऱ्यांचे कौतुक

**महाड : प्रतिनिधी**

किल्ले रायगडावर दिनांक ६ जून आणि ९ जून अशा दोन दिवस तारीख आणि तिथीप्रमाणे शिवराज्याभिषेक सोहळा पार पडला. या शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी लाखो शिवभक्त गडावर दाखल झाले होते. यादरम्यान वाहतूक विभाग आणि एसटी महामंडळाने कौतुकास्पद कामगिरी केली आहे. यामुळे होणारी वाहतूक कोंडी यावेळी टाळता येणे शक्य झाले.

या शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी देशभरातून लाखो शिवभक्त किल्ले रायगडावर दाखल झाले होते. दरवर्षी कोंझर ते किल्ले रायगड दरम्यान जागोजागी होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे शिवभक्तांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. अरुंद रस्ता आणि दुतर्फा होणारी पार्किंग यामुळे मोठ्या प्रमाणामध्ये वाहतूक कोंडी होत होती. मात्र गेली दोन वर्षांपासून वाहतूक विभाग आणि एसटी महामंडळाने या ठिकाणी दमदार कामगिरी केली आहे. कोंझर या ठिकाणी शिवभक्तांच्या गाड्या थांबवून त्याच ठिकाणी पार्किंग करून एसटीने किल्ले रायगड पर्यंत ये जा करण्याची सुविधा उपलब्ध केली गेली. याचा परिणाम म्हणून या दरम्यान होणारी वाहतूक कोंडी टाळता येणे शक्य झाले आहे. एसटीच्या सलग फेऱ्यांमुळे पर्यटक आणि शिवभक्तांना ये जा करणे सुलभ झाले.

जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतूक शाखा आणि एसटी महामंडळाने शिवभक्तांना किल्ले रायगड पर्यंत नेणे आणि तेथून पुन्हा वाहन तळाजवळ आणणे ही जबाबदारी मोठ्या कार्य कुशलतेने



सांभाळली. दिनांक ५ जून पासूनच एसटी महामंडळाने महाड आगाराच्या सर्व गाड्या वाहन तळाजवळ उभ्या केल्या. या ठिकाणी येणाऱ्या शिवभक्तांना वाहन तळामध्ये वाहन पार्क केल्यानंतर तेथून किल्ले रायगड पर्यंत नेण्यासाठी सलग फेऱ्यांचे आयोजन महाड आगार प्रमुख रितेश फुलपगारे यांच्या मार्गदर्शनाखाली केले होते. कोंझर आणि पाचाड हेलिपॅड याठिकाणाहून ही व्यवस्था करण्यात आली होती. ६ जून रोजी १५४६ फेऱ्यांमधून जवळपास ७३,४५५ प्रवाशांची तर ९ जून रोजी ५९५ फेऱ्यांमध्ये १७,८५० प्रवाशांना सुविधा उपलब्ध करून दिली. या नियोजनबद्ध सुविधामुळे शिवप्रेमींमध्ये समाधान व्यक्त करण्यात आले.

महाड आणि माणगाव एसटी आगाराच्या चालकांनी उत्साह दाखवत शिवराज्याभिषेक सोहळ्यामध्ये आपली सेवा बजावून आगळ्यावेगळ्या पद्धतीने शिवराज्याभिषेक साजरा केला. रायगडचे विभाग नियंत्रक दीपक घोडे, यंत्र अभियंता संदीप शिंदे, विभागीय वाहतूक अधिकारी प्रशांत खरे, सुरक्षा व दक्षता अधिकारी श्री. पुजारी, यांनी व महाड आगाराचे सेवानिवृत्त वाहतूक निरीक्षक शिवाजी जाधव यांनी देखील या कामगिरीमध्ये सहभाग घेतला.

## जिल्हा प्राथमिक शिक्षणाधिकारी पुनिता गुरव यांची बदली

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी पुनिता गुरव यांची प्रशासकीय बदली करण्यात आली आहे. रत्नागिरी येथील राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक कोकण विभागिय शिक्षण मंडळच्या सहसचिव म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाने याबाबतचे आदेश दिले आहेत.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागामार्फत रायगडच्या प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी पुनिता गुरव यांचाही समावेश आहे. गेली तीन वर्ष त्या रायगडच्या शालेय शिक्षण विभागात प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी म्हणून कार्यरत होत्या. त्यांना तात्काळ नवीन पदाचा पदभार स्विकारण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यांच्या रिक्त होणाऱ्या पदावर नवीन अधिकाऱ्यांची नियुक्ती केलेली नाही.

बदली करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनी तात्काळ नवीन ठिकाणचा पदभार स्विकारावा, अनधिकृत सुट्टीवर जाऊ नये, बदली रद्द करण्यासाठी आवेदने देऊ नयेत अन्यथा शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल असा इशारा बदलीच्या आदेशात देण्यात आला आहे.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे-कर्नाळा, तालुका - पनवेल, जिल्हा-रायगड येथील सामाईक जमीन मिळकत हि 1. रफीक युसुफ दाखवे, वय 62 वर्षे, धंदा-शेती/व्यवसाय रा. मु. पो. बारापाडा, ता. पनवेल, 2. रिझवाना युसुफ दाखवे, रिझवाना नियामतुल्ला भाईजी वय 55 वर्षे, धंदा-शेती/गृहिणी मु. दामत, ता. नेरळ, 3. शहनाज अकील दळवी वय 60 वर्षे, धंदा-शेती/गृहिणी मु. पो. बारापाडा, ता. पनवेल,4. असिफ अय्युब उर्फ अय्युब दाखवे वय -57 वर्षे, धंदा-शेती/व्यवसाय रा.बारापाडा, ता. पनवेल,5. रुक्साना उर्फ रूखसाना इकबाल नाईक वय 66 वर्षे, धंदाशेती/गृहिणी मु. पो. पाणी टाकी रोड, नेनीवली, डोबिवली पूर्व, टिळकनगर, ठाणे. 421201. 6. शकील अयुब दाखवे उर्फ शकिल अय्यूब दखवे वय 63 वर्षे, धंदा-शेती/व्यवसाय, मु. पो. बारापाडा, ता. पनवेल, 7. यासर रईस दाखवे वय 29 वर्षे, धंदा-शेती/व्यवसाय, घर क. 201, मु. पो. बारापाडा, ता. पनवेल, 8. सुमय्या रईस दाखवे उर्फ सुमैया मोहम्मद फैसल मुसा वय 34 वर्षे, धंदा शेती/गृहिणी 10, जुमा मस्जिद बिल्डींग, 1 ला मजला, रूम नं. 6, 10, खांडीया स्ट्रीअ कॉस लेन, ळकीम दाख्म गारडन, नागपाडा, मुंबई -400008. 9. सायरा रईस दाखवे, वय 61 वर्षे, धंदा-शेती/गृहिणी, एन-एच 17, मु. पो. बारापाडा, ता. पनवेल, 10. मा. खलील म. कासिम दाखवे उर्फमोळम्मद खलील मोहम्मद कासिम दाखवे, वय 71 वर्षे, धंदा-शेती/व्यवसाय मु.पो. बारापाडा, ता. पनवेल,11. शहीदा म. इकबाल दळवी उर्फ शहीदा मोह इकबाल दळवी वय 74 वर्षे, धंदा-शेती/गृहिणी, मु. पो. बारापाडा, ता. पनवेल 12. रय्यान इरफान देशमुख वय 31 वर्षे, धंदा-शेती/व्यवसाय, मु. दामत, ता. नेरळ, जि.13. शहनाज अकील दाखवे उर्फ मो. अकील दाखवे शहनाजवय 60 वर्षे, धंदा- शेती, मु.पो. बारापाडा, ता. पनवेल, 14. समिरा रिजवान खोत, वय 33 वर्षे, धंदा शेती /गृहिणी, रा. सदनिका क्र. एस-103, ए-विंग, हमजा रेसिडेन्सी सी.एच.एस.लि., मुन्सीपल ग्राउड, पनवेल, यांच्या मालकीची ,ताबेकब्जातील,वापरातील व वाहिवाटीतील त्यांच्या कायदेशीर हिश्श्याचे क्षेत्र असलेली खालील परिशिष्टात वर्णन केलेली शेतजमीन आम्ही 1. श्री. चंद्रकांत शंकर पाटील वयः 52 वर्षे, धंदा-शेती/ व्यवसाय 2. सौ. राजेश्री चंद्रकांत पाटील वयः 48 वर्षे, धंदाशेती/ गृहिणी दोघे रा. घर क्र. 67 दत्त मंदिराजवळ, तारा गाव पो. बारापाडा, ता. पनवेल, जि. रायगड 410206 हे कायम स्वरूपी नोंदणीकृत खरेदिखत करणेचा व्यवहार ठरविला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
मौजे कर्नाळा, तालुका पनवेल, जिल्हा रायगड

| भूमापन क्रमांक व उपविभाग | भोगवटा वर्ग | क्षेत्र हे. आर. चौ.मी. | आकार |
|---|---|---|---|
| 51/1 | 2 | 0-48.90<br>पो.ख. 0-04.40<br>एकूण क्षेत्र 0-53.30 | 5.75 |
| एकूण क्षेत्र 0-53.30 पैकी 0-03.05 क्षेत्र वगळुन उर्वरित क्षेत्राचा समजोता करार करण्यात येत आहे. | | | |

सदरहू शेतजमीन या मिळकतीमध्ये अन्यकोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क,विकसनकरार, हितसंबंध,कुळ,वहिवाट,ताबा,कब्जा,इंजमेंट,साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीसीच्या तारखेपासून १४ दिवसाचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर, समक्ष वा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे विहित मुदतीत कोणत्याही हरकती दाखल न झाल्यास वरील मिळकत हि निर्वेध व बोजारहित आहेत व हरकत असल्यास ती सोडून दिली आहे असे गृहीत धरून आम्ही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदिखताचा व्यवहार पूर्ण करतील.

सही / श्री. चंद्रकांत शंकर पाटील
ठिकाण: तारा गाव
दिनांक: १२/०६/२०२५
रा. घर क्र. 67 दत्त मंदिराजवळ,तारा गाव पो. बारापाडा, ता. पनवेल, जि. रायगड 410206 मो. 9595123333



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-पालीबुद्रुक, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भूमापन नं./ हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| १६९/३ | १-३३-००<br>पो. ख. ०-०९-१०<br>एकूण १-४२-१० | २०.८७ | श्रीमती इंदिरा रामचंद्र गव्हाणकर<br>श्रीमती कविता काशिनाथ पाटील<br>श्रीमती जनाबाई सिताराम पाटील<br>श्रीमती व्दारका बाळकृष्ण पाटील<br>श्रीमती पद्माबाई सिताराम पाटील<br>श्री.विश्वनाथ काशिनाथ पाटील<br>श्रीमती सारीका काशिनाथ पाटील<br>श्री.सुधिर काशिनाथ पाटील<br>श्रीमती जयश्री जनार्दन पाटील<br>श्री.अरविंद जनार्दन पाटील<br>श्री.कल्पेश जनार्दन पाटील<br>श्रीमती प्रतिक्षा पुंडलिक पाटील |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. ११/०६/२०२५

सही/-
ॲड. प्रशांत अशोक भुजबळ
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल.
मो.क्र. : ९९३०३६९८६१


## कृषी लाभासाठी ‘ॲग्रीस्टॅक’ नोंदणी करा

**मुरुड : प्रतिनिधी**

राज्यातील शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक असलेल्या सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी आता ‘ॲग्रीस्टॅक’ नोंदणी बंधनकारक करण्यात आली आहे. नोंदणी केल्याशिवाय पीएम किसान, पीकविमा, आपत्ती नुकसान भरपाई यांसारख्या योजना मिळणार नाहीत.

राज्यातील कृषी क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करून शासनाच्या विविध योजनांचा जलद गतीने व परिणामकारकरीत्या लाभ शेतकऱ्यांना देणे सुलभ व्हावे याकरिता केंद्र शासनाची ‘ॲग्रीस्टॅक’ योजना राबविण्यात येत आहे.ग्रीस्टॅक नोंदणी करून शेतकरी ओळखपत्र (फार्मर आयडी) काढल्याशिवाय कृषी विभागाच्या योजनांचा लाभ मिळणार नसल्याने सर्व शेतकऱ्यांनी ग्रीस्टॅक नोंदणी करावी असे आवाहन तालुका कृषी अधिकारी मनिषा भुजबळ यांनी केले आहे.

ॲग्रीस्टॅक योजनेमुळे शेतकऱ्यांना पीएम किसान योजना, नमो किसान योजना,पीक विमा तसेच आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत नुकसान भरपाई, पीक कर्ज तसेच कृषी विभागामार्फत प्रात्यक्षिकांतर्गत बियाणे , निविष्ठा व इतर विविध योजनांचा थेट लाभ मिळणार असून डिजिटल पद्धतीने जमीन नोंदीमुळे शेतकऱ्यांचा वेळ आणि खर्च वाचणार आहे.

या योजनेअंतर्गत सर्व शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच (फार्मर रजिस्ट्री), शेतकऱ्यांच्या शेतातील हंगामी पिकांचा माहिती संच (क्रॉप सोन रजिस्ट्री) व शेतांचे भू संदर्भिकृत (जिओ रेफरन्स लँड पार्सल) यांचा माहिती संच एकत्रितरीत्या तयार करण्यात येत आहे. ॲग्रीस्टॅक’मध्ये मुरुड तालुक्यातून अद्यापही ११ हजार शेतकऱ्यांची नोंदणी नाही नोंदणी न केलेल्या शेतकर्यांनी कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करण्याचे आवाहन केले आहे .


## ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद
**ता. पनवेल, जि. रायगड**
**(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९)**

जा.क्र.६६६/२०२५
दिनांक :- ११/०६/२०२५

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पालीदेवद ग्रामपंचायतीकडील कर आकारणी नोंद वहीतील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

**मे २०२५**

| अ.क्र. | मालमत्ता घेणाऱ्याचे नाव | मालमत्ता देणाऱ्याचे नाव | दस्तऐवज अनुक्रमांक | दस्तऐवज दिनांक | मालमत्ता वर्णन |
|---|---|---|---|---|---|
| १ | अश्विनी चारुदत्ता लारी /प्रतिक चारुदत्ता तारी | मयत हाशा गणू नाईक व मयत राधा हाशा नाईक यांची वारस कल्पना राजेश ठाकूर | पवल१-२५५३-२०२५ | २९/०३/२०२५ | सदनिका नं. १७, दुसरा मजला, युगातक को.हौ. सो. बि.नं. ए६/१, मौजे पालीदेवद |
| २ | उद्धव बाळासाहेब जांभळकर | मोहन कृष्णा देऊळकर / पूर्णिमा मोहन देऊळकर | पवल१-७९६२-२०२४ | २५/१०/२०२४ | सदनिका नं. १०१, पहिला मजला, ई विंग, कार्तिक्य गार्डन को.हौ.सो, मौजे पालीदेवद |
| ३ | सौरभ शरद कळमकर | योगेश प्रभाकर ओतारी | पवल३-११५८१-२०२५ | ०९/०५/२०२५ | सदनिका नं. बी २०४, दुसरा मजला, बी विंग, ओम श्री कार्तिक्य गार्डन को. हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| ४ | पांडुरंग ईश्वर गायकवाड/ रुपाली पांडुरंग गायकवाड | निलेश सुदाम जोशी / वृषाली निलेश जोशी | पवल४-४५६८-२०१८ | ०७/०४/२०१८ | सदनिका नं.१९, दुसरा मजला, बि.नं. जी ८, यमुना को.हौ. सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| ५ | प्रमोद सखाराम गवई | प्रतिक्षा सखाराम गवई | पवल४-१६५०-२०२५ | २८/०१/२०२५ | सदनिका क्र. ३०२, तिसरा मजला, मोहित इन्क्लेव्ह को.हौ. सो. मौजे पालीदेवद |
| ६ | आशिष विजय आंब्रे | बबन नाथा भादवे | पवल२-३५४६-२०२४ | २१/०२/२०२४ | सदनिका क्र.२०७, दुसरा मजला, साहिल अपार्टमेट को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर. |

वरीलबाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पालीदेवद ग्रामपंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असल्यास सदर नोटीसीच्या प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९ नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
(श्री. एन. जी. केणी)
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद,
ता. पनवेल, जि. रायगड

सही/-
(सौ. योगिता राजेश पाटील)
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद,
ता. पनवेल. जि. रायगड



### TENDER NOTICE

Sealed Tenders /offers are invited by Indira Complex Co -operative Housing Society Ltd, Plot No. 192 A/B, Near Gune Hospital, Panvel. 410206. For proposed redevelopment in lieu of rights to sell the additional flats from Builders /Developers of repute. The tender document can be collected from the PMC office, For Urban Analysis and solutions Consultancy Services A-1307, plot no. 18/19, sector 15, CBD Belapur. **(Contact Name : - Mrs. Neha Raut-8803228888)** from the Date: - 12-06-2025 to 25-06-2025(Both dates included) between 10.30 am to 5.00 pm on payment of Rs. 20000/- (Nonrefundable) by Demand Draft in favor of Indira Complex Co-operative Housing Society Ltd. Plot No.192 A/B, Near Gune Hospital, Panvel.-410206 Sealed Tender Bids shall be submitted in the manner as prescribed in the instructions to tenderers as mentioned in Tender Document on and before 02-07-2025 by 5.00 pm in the PMC Office.

The society reserves right to reject any or all bids without assigning any reason

Date : - 08-06-2025
Place : - Panvel.

| Sd/- | Sd/- | Sd/- |
|---|---|---|
| Chairman | Secretory | Treasurer |

For Indira Complex Co-Op.Hsg. society Ltd.
Plot No. 192 A/B, Near Gune Hospital,
Panvel. 410206. Dist. Raigad

# फसवणुकीचे प्रकार वाढले

## ॲपमध्ये फायद्याचे आमिष; २४ लाख ७१ हजार उकळले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ॲपमध्ये जास्तीचा फायदा मिळेल असे आमिष दाखवून एका महिलेची तब्बल २४ लाख ७१ हजारची फसवणूक केल्याप्रकरणी चौघा विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

४४ वर्षीय महिला सेक्टर ५, खारघर येथे राहत असून त्यांनी फेसबुकच्या माध्यमातून शेअर मार्केट ट्रेडिंगचा व्हिडिओ पाहिला. या वेळी एका व्यक्तीने व्हाट्सअप वर मेसेज करत गुंतवणूक करून जास्त नफा मिळवता येईल असे सांगितले. आणि लिंक पाठवली. लिंक क्लिक केली असता त्या ग्रुपमध्ये जॉईन झाल्या. त्यात शेअर मार्केट संबंधित मेसेज व आर्थिक फायद्या बद्दल माहिती येत होती. त्यावेळी त्यातील मेंबरने या पमध्ये गुंतवणूक करा आर्थिक फायदा होईल असे सांगून आमिष दाखवले. सुरुवातीला त्यांनी ११ हजारची गुंतवणूक केली. त्यानंतर सात लाख रुपये पाठवले. असे करता करता त्यांनी बँक खात्यातून २४ लाख ७१ हजार इतकी रक्कम पाठवली. पैसे मिळवण्याकरता व्हॉट्सॲप कॉल केला असता समोरील व्यक्तीने फोन उचलला नाही. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

## अज्ञाताने २४ लाख ९० हजार खात्यातून काढले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

व्हॉट्सॲप व्हिडिओ कॉलद्वारे संपर्क साधून पोलीस ठाणे येथील अधिकारी बोलत असून गुन्ह्यातील आरोपीची धमकी देत २४ लाख ९० हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी दोन अनोळखी व्यक्तींविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

हनुमंत शंकर कदम हे सेवानिवृत्त असून सेक्टर ७, नवीन पनवेल येथे राहतात. डिसेंबर २०२४ मध्ये त्यांना व्हाट्सअप कॉल आला आणि कुलाबा पोलीस ठाण्यातून गुप्ता अधिकारी बोलतोय तुम्ही पोलीस ठाण्यात या असे समोरील व्यक्तीने सांगितले. तुम्ही आला नाही तर तुम्हाला पकडले जाईल तुमच्यावर ८० कोटींचा गुन्हा दाखल असून २४० लोक यात आहेत, त्यात तुमचंदेखील नाव आहे असे बोलून फोन कट करण्यात आला. बँक खातात जेवढे पैसे असतील ते कोर्टात जमा करावे लागतील आणि पाच दिवसानंतर सर्व पैसे परत मिळतील असे सांगितले आणि पैसे जमा केले नाही तर इन्कम टॅक्सचा छापा पडेल असे सांगण्यात आले. त्यावेळी त्यांनी त्या अनोळखी व्यक्तीने सांगितलेल्या बँक खात्यावर साडेसात लाख रुपये पाठवले. त्यानंतर ससमोरील व्यक्तीला फोन लावला असता समोरच्या व्यक्तीचा फोन लागला नाही.

पाच दिवसांनंतर पैसे देखील अकाउंटला परत आले नाहीत. त्यांनी सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असता खांदेश्वर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

# मालमत्ता कर, पाणी देयकाची माहिती व भरणा करण्यासाठी 'व्हॉट्सॲप चॅटबॉट'

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईकर नागरिकांना महानगरपालिकेशी संबधित सेवा मोबाईलच्या एका क्लिकवर ऑनलाईन उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात असून महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ऑनलाईन सुविधा उपलब्धता हे लक्ष्य नजरेसमोर ठेवून लोकाभिमुख कार्यप्रणाली राबवली जात आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेचा मालमत्ताकर अथवा पाणीपट्टी भरण्यासाठी सर्व प्रकारच्या ऑनलाईन सुविधा महानगरपालिकेने उपलब्ध करुन दिल्या असून नागरिक महानगरपालिकेची वेबसाइट www.nmmc.gov.in तसेच My NMMC ॲप यावरून आपली देयक रक्कम भरु शकतात. याशिवाय क्रेडीट कार्ड, डेबिट कार्ड तसेच जीपे, फोनपे, पेटीएम अशा सर्व युपीआय सुविधांव्दारेही करभरणा सुविधा उपलब्ध आहे.

यामध्ये आता 'व्हॉट्सॲप चॅटबॉट' ही नवी डिजीटल सेवा सुरू करण्यात आली असून याद्वारे नागरिकांना आपल्या

### नवी मुंबई मनपाची अत्याधुनिक कार्यप्रणाली



मालमत्ताकराविषयी तसेच पाणीपट्टी विषयची माहिती आणि देयक भरणासह इतर सेवा सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या सोशल मिडिया माध्यमावर अर्थात व्हॉट्स पवर सहज उपलब्ध असणार आहेत.

याकरिता ८२९१९२०५०४ हा नवी मुंबई महानगरपालिकेचा अधिकृत व्हॉट्सॲप चॅटबॉट क्रमांक असून ही सेवा वापरण्यासाठी नागरिकांनी या क्रमांकावर केवळ 'Hi' असा संदेश पाठवायचा आहे. यानंतर चॅटबॉट त्या व्यक्तिशी संवाद साधेल. सुरुवातीला मराठी अथवा इंग्रजी असा भाषेचा पर्याय निवडण्यास सांगण्यात येईल. त्यानंतर मालमत्ता कर किंवा पाणीपट्टी यापैकी माहिती हवी असलेली सेवा निवडावी लागेल.

मग आपला मालमत्ता आयडी किंवा पाणी ग्राहक क्रमांक प्रविष्ट करावा लागेल. त्यानंतर नागरिकांना मालमत्ता कराची माहिती किंवा पाणी बिलाची माहिती, नवीन बील प्रत, थेट पेमेंट लिंक मिळवता येईल. याद्वारे नागरिक आपल्या देयक रक्कमेची माहिती मिळवू शकतात तसेच थेट पेमेंट लिंकव्दारे आपली देयक रक्कमही भरणा करु शकतात.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यालयीन कामकाजात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना सुलभ रितीने सेवा उपलब्ध व्हाव्यात या करिता महानगरपालिका प्रयत्नशील असून 'व्हॉट्स ॲप चॅटबॉट' हे पारदर्शक, जलद व सुलभ सेवा देण्यासाठी महानगरपालिकेने उचललेले एक महत्वाचे पाऊल असून नागकिंनी या सुविधेचा जास्तीत जास्त लाभ करून घ्यावा, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

## ट्रकची स्कुटीला धडक, तरुणीचा मृत्यू

**पनवेल :** ट्रकने स्कुटीला दिलेल्या धडकेत १९ वर्षीय आयेशा जयेंद्र जग्वान (रा. कळंबोली) या तरुणीचा मृत्यू झाला. या अपघाताप्रकरणी ट्रक (एमएच ०५ एफजे ७६१७)वरील चालकाविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

मारुती नंदन सोसायटी, कामोठे येथील १९ वर्षीय पार्थ जाधव हा पाच जून रोजी आयेशा हिच्यासोबत स्कुटी (एमएच ४६ आर ८४५९)ने खारघरला जाण्यासाठी निघाले. दुपारी पावणेतीनच्या सुमारास पनवेल-सायन रोडवर पुरुषार्थ ब्रिज येथील ब्रिज उतरून खाडी पुलावर आले असता पाठीमागून वेगाने आलेल्या ट्रकने त्यांच्या स्कुटीला धडक दिली. यात दोघेही खाली पडले. आयेशाच्या डोक्याला व उजव्या हाताला गंभीर दुखापती झाल्या. तिला एमजीएम रुग्णालय कामोठे येथे नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

# उरण कोप्रोली ते श्रीक्षेत्र कार्ला बाईक रॅली

**उरण : बातमीदार**

रायगड जिल्ह्यात विशेषत: उरण तालुक्यात आई एकविरेला मानणाऱ्यांची, आई एकविरा मातेला पूजणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे आई एकविरा मातेचे महात्म्य लक्षात घेता भक्तांना वर्षातून एकदा तरी वारी करण्याच्या दृष्टीने दरवर्षी पावसाळ्यात बाईक रॅली काढली जाते.

कोप्रोली गावातील आई एकविरा मातेचे भक्त देवीचंद म्हात्रे यांनी सण २०२२ मध्ये या रॅलीची सर्वप्रथम सुरुवात केली होती. सण २०२२ मध्ये सुरू झालेली ही रॅली आजही अखंडीतपणे तेवढ्याच श्रद्धेने तेवढ्याच जोमाने सुरू आहे. आजपर्यंत या बाईक रॅलीला आई एकविरा मातेच्या कृपेने कोणतेही गालबोट लागले नाही. अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने, कोणालाही त्रास न देता बाईक रॅली काढली जाते हे या बाईक रॅलीचे खास वैशिष्ट्य आहे. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी रविवार दिनांक २२ जून २०२५ रोजी सकाळी ७ वाजता कोप्रोली (उरण )ते श्री क्षेत्र कार्ला (लोणावळा)या मार्गावर भव्य दिव्य असे बाईक रॅली काढण्यात येणार आहे.

कोप्रोली गावचे भक्त देवीचंद म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर



बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले असून भाविक भक्तांना या रॅलीतून वेगळाच आनंद, समाधान भेटत असतो. त्यामुळे दरवर्षी बाईक रॅली मध्ये सहभागी होणाऱ्या भाविक भक्तांची संख्या वाढतच आहे. यंदा बाईक रॅलीचे ४ थे वर्ष आहे.यंदा रविवार २२ जून २०२५ रोजी कोप्रोली गावातून बाईक रॅली निघणार असून ज्यांना ज्यांना या बाईक रॅलीत सहभागी व्हायचे आहे त्यांनी देवीचंद म्हात्रे - ९८२१८३८४०८, विधाता पाटील - ९९२०८६२०२९, प्रसाद पाटील - ९७६९६०४०१२, चेतन गावंड - ९८१९७५९१०५, पिंट्या नाईक - ८४१९९३६१३४ यांच्याशी संपर्क साधावे असे आवाहन करण्यात आले आहे.

### रॅलीची दिनचर्या

सकाळी ६:३० वाजता कोप्रोली (उरण) मधील आई एकविरा मंदिरात आरती, सकाळी ७ वाजता छत्रपती शिवाजी महाराजांना मान वंदना देऊन रॅलीला प्रारंभ, दांडफाटा येथे नाष्ट्यासाठी थांबणे, दुपारी १२ च्या दरम्यान श्री क्षेत्र कार्ला येथील आई एकविरा मातेचे दर्शन, दुपारी भोजन, एकविरा मंदिराची साफसफाई, एकविरा मंदिर परिसरात वृक्षारोपण, संध्याकाळी ठीक ४ वाजता परतीचा प्रवास

## चिरनेरमध्ये नालेसफाई

**उरण :** पावसाचे आगमन लक्षात घेता, चिरनेर गावातील नाले सफाईची कामे युद्ध पातळीवर सुरू करण्यात आली आहेत. चिरनेर ग्रामपंचायतीच्या मार्फत आणि चिरनेर गावातील आपत्ती व्यवस्थापन समितीच्या देखरेखेखाली, चिरनेर हद्दीत येणाऱ्या मुख्य आणि अंतर्गत नाल्यांमध्ये अडकलेला गाळ काढून नाल्यांची सफाई करण्याची कामे जोरदारपणे सुरू आहेत.

संभाव्य धोका टळावा, यासाठी सफाई करण्यात येत असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन समितीच्या वतीने देण्यात आली.

## शिरवणेत गणेश मंदिर वर्धापन दिन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शिरवणे येथील श्री गणेश मंदिर चॅरिटेबल ट्रस्टच्या विद्यमाने शिरवणे येथील श्री स्वयंभू गणेश मंदिराचा १५वा वर्धापन दिन आणि पालखी सोहळा शुक्रवार व शनिवार रोजी विविध धार्मिक, विधिवत पूजापाठ करून साजरा केला जाणार असल्याचे माजी महापौर व ट्रस्टचे सचिव जयवंत सुतार यांनी सांगितले.

शुक्रवारी सकाळपासून श्री गणेश याग प्रारंभ, मुख्यदेवता, अग्नी, नवग्रह देवता स्थापना तसेच विविध धार्मिक पूजापाठ विधिवत होणार आहेत. सायंकाळी गावदेवी प्रासादिक भजन मंडळ, (रोहिंजन) सुनील पाटील बुवा यांचे सुश्राव्य भजन तर रात्रौ हभप शारदाताई सूर्यवंशी -जाधव (नाशिक) यांचे सुश्राव्य किर्तन होणार आहे.

यानंतर दुसऱ्या दिवशी शनिवारी सकाळी विविध धार्मिक पूजा आणि महाआरती, दुपारी श्री विष्णूलक्ष्मी प्रासादिक महिला



भजन मंडळ (दापोली-पारगाव) गायिका कुमारी स्नेहल पाटील यांचे सुश्राव्य भजन तर दुपारी भक्तांसाठी महाप्रसाद ठेवण्यात आला आहे.

त्यानंतर सायंकाळी हनुमान प्रासादिक भजन मंडळ, शिरवणे बुवा नंदकुमार सुतार व देवेंद्र पवार यांचे भजन होणार असून सायंकाळी श्री गणेश पालखी मिरवणूक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याचे ट्रस्टचे अध्यक्ष नामदेव ठाकूर, सचिव जयवंत सुतार यांनी कळविले आहे.

## महिलांसाठी आरोग्य शिबिर

**उरण : बातमीदार**

कामगार नेते शाम म्हात्रे यांच्या सातव्या पुण्यस्मरण दिनी आगरी शिक्षण संस्था सेक्टर ६ खांदा कॉलनी पनवेल येथे महिला आरोग्य तपासणी शिबिर, नेत्र तपासणी शिबिर आणि कर्क तपासणी शिबिर आणि कर्क रोगावर व्याख्यानाचे आयोजन केले होते.

या शिबिराचा लाभ मोठ्या संख्येने महिला भगिनीने घेतला. एक महिला जागृत झाली तर संपूर्ण कुटुंबाला कर्क रोगापासून दूर ठेवू शकते. आज देशात कर्क (स्कॅन्सर) रोगाचे प्रमाण वाढत आहे. या रोगाचे रुग्ण आज मृत्यसी झुंज देत आहेत. या रोगाची लक्षणे प्रथम समजून आली तर कर्क रोगाला दूर ठेवू शकते यासाठी माझ्या माध्यमातून काहीसा प्रयत्न आज कामगार नेते शाम म्हात्रे यांच्या पुण्यस्मरण दिनी मी केला आहे, असे मनोगत कामगार नेत्या श्रुती म्हात्रे यांनी पनवेल येथे व्यक्त केले.

# नवी मुंबईत पहिल्यांदाच शिवराज्याभिषेक सोहळा

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईत विष्णुदास भावे नाट्यगृहात शिवतुतारी प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शिवराज्याभिषेक सोहळा आयोजित करण्यात आला होता. या वेळी प्रमुख पाहुणे विश्वास पाटील यांनी आपल्या प्रभावी शैलीत सांगितले, शिवाजी महाराज हे केवळ पराक्रमी योद्धे नव्हते, तर अत्यंत दूरदृष्टी असलेले राजकारणी होते. फितुरांवर त्यांनी केलेली कारवाई, प्रशासन रचना आणि राज्याभिषेकाचे ऐतिहासिक महत्त्व याविषयी त्यांनी ऐतिहासिक दाखल्यांसह सखोल मांडणी केली.



हा ऐतिहासिक सोहळा प्रेक्षकांच्या भरघोस उपस्थितीत, हाऊसफुल गर्दीत अत्यंत उत्साही वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाला नवी मुंबईतील विविध सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक संस्था, मान्यवर नागरिक आणि युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. विशेष आकर्षण ठरलेले दहावी व बारावी परीक्षेतील प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिवतुतारी प्रतिष्ठानचे संस्थापक प्रा. रवींद्र पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे नियोजन स्तुत्य ठरले.

या वेळी पद्मश्री अच्युत पालव म्हणाले, मराठी भाषा लिहायला सोपी वाटते, पण ती खूप खोल आहे. त्या भाषेच्या साधनेतून मिळालेला हा पुरस्कार म्हणजे जीवनभराच्या तपस्येचे चीज आहे. उद्योजक प्रकाश बाविस्कर यांनी सांगितले की,१९९१ मध्ये महानगरपालिकेच्या स्थापनेपासून सर्व विभागात कामाची संधी तर महापालिकेचा नकाशा करण्याचे भाग्य मला लाभले. भाड्याच्या घराने प्रवास सुरू करून, आजपर्यंत हजार कुटुंबांना घर मिळवून देण्याचा प्रवास मी अनुभवला आहे.अशोक हांडे यांनी सांगितले,

माझ्या पहिल्या कवितेपासून ते पद्मश्री अच्युत पालव यांच्या गौरवापर्यंत, सर्व प्रेरणेचा स्रोत म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नारायण लांडगे आणि कवीश्वर गोपाळे यांनी संयुक्तपणे केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून 'पानिपत' संभाजी या सुप्रसिद्ध कादंबऱ्यांचे लेखक, ज्येष्ठ इतिहास संशोधक विश्वास पाटील, त्यांच्या सोबत पद्मश्री सुलेखनकार अच्युत पालव, मराठी बाणा फेम अशोक हांडे, मराठी उद्योजक प्रकाश बाविस्कर, अर्जुन पुरस्कार विजेत्या कबड्डीपटू नवी मुंबई पालिकेच्या उपायुक्त अभिलाषा म्हात्रे यांचा विशेष सत्कारही या वेळी झाला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला, वाशीच्या शिवाजी चौकातील, छत्रपती शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर ढोल ताशांच्या तुतारीच्या गजरामध्ये मिरवणूक विष्णुदास भावे नाट्यगृहात आल्यानंतर प्रसिद्ध शाहिर रूपचंद चव्हाण यांच्या शाहिरी बाणा या सादरीकरणाने कार्यक्रमाची रंगतदार सुरुवात झाली. उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात त्याला दाद दिली.

# ताज्या मासळीची आवक घटल्याने दरात वाढ

**उरण : रामप्रहर वृत्त**

पावसाळ्यातील मासेमारी बंदी लागू झाल्याने हजारो मासेमारी बोटी नांगर टाकून किनाऱ्यावर विसावल्या आहेत. परिणामी मासळीची आवक घटली आहे. त्यामुळे मासळीच्या दरात प्रचंड वाढ झाली आहे. याचा फटका खवय्यांना बसू लागला आहे, मात्र पावसाळ्यात शितगृहात साठवून ठेण्यात आलेली व या काळात शेजारील प्रांतातील मासेमारी सुरू होत असल्याने खवय्यांची भिस्त या मासळीवर असणार आहे.

बंदीमुळे मासळीची आवक घटल्याने मासळीच्या दरात २५ ते ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. उरण परिसरात ७०० पेक्षा अधिक मासेमारी बोटी आहेत. राज्य आणि केंद्र सरकारच्या माध्यमातून ६०० मीटर लांबीचे 'फिशिंग-डॉक' करंजा येथे उभारण्यात आले आहे. यामध्ये, मासेमारी बोटीतील मासळी बंदरात उतरवून त्याच्या खरेदीविक्री होत होती ती दोन महिन्यांच्या बंदीमुळे मासळीची आवक बंद आहे. पापलेट, सुरमई, हलवा आणि कोळंबी यासह अनेक चविष्ट माशांचे प्रकार कमी प्रमाणात मिळत असल्याने किलोमागे या माशांचे दर अधिक वाढले आहेत. एका पापलेटच्या नगासाठी एक हजार २०० ते १४०० रुपये मोजावे लागत आहेत. तर अधिक मागणी असलेल्या सुरमईसाठी एक हजार, कोळंबी ५०० तर हलवा ५५० वर जाऊन पोहचला आहे.



### खाडी किनाऱ्यावर मिळणारे मासे...

येथील खाडी किनाऱ्यावर आणि चिखलात निवटे, खरब्या खुबे, माकोल, कोळीम, ताजी कोळंबी आदी प्रकारचे मासळीचे प्रमाण मोठे होते. स्थानिक मासळीचे प्रमाण कमी झाल्याने मासळीच्या दरात प्रचंड वाढ झाली असून परंपरागत खाद्य असलेल्या मासळीला अधिकचे पैसे मोजावे लागत असल्याची माहिती स्थानिक महेश घरत यांनी दिली आहे.

## खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात पर्यावरण दिन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात गुरुवारी (दि.५) नेचर क्लब व वनस्पतीशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण दिन साजरा करण्यात आला.

प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांच्या हस्ते महाविद्यालय प्रांगणात पिंपळ, बदाम, आणि गुलमोहर यासारख्या वृक्षांचे रोपण करण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना 'प्लास्टिकमुक्त परिसर' या संकल्पनेवर प्रतिज्ञा करण्यात आली. या पर्यावरणीय उपक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. पूजा लांजेकर यांनी केले तसेच नेचर क्लब व वनस्पती शास्त्र विभागातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



## नुकसानग्रस्त गरीब महिलेस मदतीचा हात



**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील पिरकोन गावातील महिला आशा परमजीत सिंग हिला वादळी पावसामुळे संपूर्ण घराचे पत्रे उडून अतोनात नुकसान झाले. हे समजताच श्री गणेश महिला मंडळ बचत गट यांच्या माध्यमातून आर्थिक मदत करण्यात आली.

श्री गणेश महिला मंडळ बचत गटाच्या माध्यमातून हळदीकुंकूचे कार्यक्रम करून महिलामध्ये जागरूकता निर्माण केली. श्री गणेश महिला बचत गटाच्या सचिव बिंदू गावंड यांनी अनेक महिलांना उद्योग धंद्यासाठी वजन काटे भेट दिली. खुर्च्या आणून कार्यक्रमात कमी दरात देण्यात आल्या, अशी समाजसेवाचे व्रत असणाऱ्या बचत महिला गट होय.

या वेळी श्री गणेश महिला मंडळाच्या अध्यक्ष लक्ष्मी गावंड, सचिव बिंदू गावंड, खजिनदार शिल्पा गावंड, सदस्य शारदा गावंड, योगिता गावंड, दिव्या गावंड, अक्षता गावंड, राजश्री म्हात्रे, कविता गावंड, अपूर्वा गावंड, कविता. क. गावंड, कुंदा गावंड, अलका गावंड, अविशा गावंड, मयुरी गावंड, बेबी गावंड आदी महिला या कार्यक्रमावेळी उपस्थित होत्या.

# दासगावमध्ये विद्युत खांब कोसळला

## वीज कर्मचारी जखमी



**महाड : प्रतिनिधी**

दासगाव बौद्धवाडी येथे मंगळवारी रात्री वीज यंत्रणेमध्ये बिघाड झाला असता महावितरणचे कंत्राटी कामगार वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी विजेच्या फोनवर चढले असता गंजलेला हा विजेचा खांब खाली कोसळला. यामध्ये हा कंत्राटी कामगार जखमी झाला आहे.

दासगाव बौद्धवाडी येथे सायंकाळी सात वाजता वीजपुरवठा खंडित झाला असता महावितरणचे कर्मचारी निवास संजय बारगीर हे वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी आले. या दरम्यान त्यांनी त्या ठिकाणी असलेल्या विजेच्या पोलवर दुरुस्ती करण्यासाठी चढले होते, मात्र गंजलेला खांब रात्रीच्या अंधारात दिसला नाही आणि वीज कर्मचारी निवास बारगीर पोलवर चढताच बोल खाली कोसळला. या अपघातामध्ये निवास संजय बारगीर हा वीज कर्मचारी जखमी झाला आहे. त्याच्यावर तत्काळ उपचार करण्यासाठी एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

हा विजेचा खांब बदलण्यात यावा अशा प्रकारची मागणी स्थानिक ग्रामस्थांनी वारंवार केली होती, मात्र याकडे महावितरणने अनेकदा दुर्लक्ष केले. यामुळे हा अपघात झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

सध्या महावितरणकडे कंत्राटी पद्धतीने विज कर्मचाऱ्यांची भरती केली जात आहे. या कर्मचाऱ्यांचा ठेका देण्यात येत असून ठेकेदाराकडून कामगारांच्या सुरक्षेबाबत सुरक्षा साधने पुरवली जात नसल्याचा आरोपदेखील ग्रामस्थांनी केला आहे.

# वाडगाव प्रायमरी इंग्रजी शाळेत विविध उपक्रम



**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबागनजीक वाडगावमध्ये बापदेव सामाजीक सेवाभावी संस्था वाडगाव व वाडगाव ग्रा.प. सहकार्याने नव्याने सुरू करण्यात आलेल्या प्रायमरी इंग्रजी शाळेच्या शुभारंभासह विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप व वृक्षारोपण कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला.

वाडगाव राजिप शाळा येथे मंगळवारी (दि.१०) सकाळी अकरा वाजता प्रायमरी इंग्रजी शाळेचा शुभारंभ कार्यक्रमासह वाडगाव मधील सर्वच विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप, तसेच वाडगाव राजिप शाळा व वैकुठ धाम परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम झाला. वाडगाव राजिप शाळेच्या समोरील सभागृहात आयोजीत कार्यक्रमास प्रायमरी इंग्रजी शाळेचे उद्घाटक सरपंच सारिका गणेश पवार व रा.कॉ. अलिबाग तालुका अध्यक्ष व उपसरपंच जयेंद्र का. भगत यांच्यासह प्रमुख अतिथी अलिबाग पं.स.गटशिक्षण अधिकारी सुनील गवळी, जि.प. रायगड उपशिक्षणाधिकारी सुनील भोपळे तसेच हितचिंतक नरेंद्र गोंखले, समाजसेवक मंगेश नाईक, वाडगाव राजिप शाळा मुख्याधिपिका सुगंधा पाटील, माजी सरपंच सरिता भगत, वाडगाव ग्रा.प. अधिकारी सोनाली पाटील, वाडगाव ग्रा.प.सदस्य व सदस्या आदी मान्यवरांची उपस्थिती होती. या वेळी मोठ्या संख्येने विद्यार्थीवर्ग व पालकवर्ग तसेच ग्रामस्थ वाडगाव यांची उपस्थिती होती.

प्रारंभी बापदेव सामाजीक सेवाभावी संस्था वाडगाव व वाडगाव ग्रा.प. सहकार्याने नव्याने सुरू करण्यात आलेल्या प्रायमरी इंग्रजी शाळेचा शुभारंभ रा.कॉ. अलिबाग तालुका अध्यक्ष जयेंद्र भगत व माजी सरपंच सरिता भगत यांचे हस्ते फित कापून करण्यात आला. त्यानंतर वाडगाव राजिप शाळेच्या समोरील सभागृहात मान्यवरांचे हस्ते दिपप्रज्वलन, मान्यवरांचे स्वागत, सत्कार व विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वाडगाव ग्रा.प.उपसरपंच जयेंद्र भगत यांनी भुषविले. या वेळी बापदेव सामाजीक सेवाभावी संस्था वाडगाव वतीने उपस्थित मान्यवर सरपंच सारिका पवार, उपसरपंच जयेंद्र भगत व प्रमुख अतिथी पं.स.गटशिक्षण अधिकारी सुनील गवळी, जि.प. रायगड उपशिक्षणाधिकारी सुनील भोपळे, नरेंद गोखळे, मंगेश नाईक, व मुख्याधिपिका सुंगधा पाटील आदी मान्यवरांचे स्वागत पुष्पगूच्छ प्रदान करून करण्यात आले. या वेळी सुनील गवळी, सुनील भोपाळे, नरेंद्र गोखळे, मंगेश नाईक, सुंगधा पाटील, उपसरपंच जयेंद्र भगत आदीने मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सुनील थळे, प्रास्ताविक नितिन पाटील, आभार रमेश भगत यांनी व्यक्त केले.

त्यानंतर उपस्थित वाडगाव मधील सर्व विद्यार्थीवर्गास रा.कॉ. तालुका अध्यक्ष तथा वाडगाव ग्रा.प. उपसरपंच जयेंद्र भगत यांचे वतीने मोफत वहया वाटप करण्यात आल्या. तसेच कार्यक्रमाचे शेवटी वाडगाव राजिप शाळा प्रांगणात सर्व मान्यवरांचे उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी वाडगाव वैकुंठ धाम परिसरात कंदब, कनेर, करंज, बांबू, जांभूळ, आवळा, भाहवा, कडूलिंब आदी ५०० वृक्ष रोपटयांचे वृक्षारोपण कार्यक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बापदेव सामाजीक सेवाभावी संस्था, वाडगाव यांचे वतीने अध्यक्ष रमेश भगत, उपाध्यक्ष प्रदीप आंग्रे, सचिव प्रभाकर भगत, खजिनदार नंदकुमार थळे, सदस्य भास्कर भगत, शंकर गोविंद पाटील, केशव पाटील, मधुकर थळे, गणपत पवार, दिलिप ठाकूर, जयराम पाटील तसेच वाडगाव राजिळप शाळा मुख्याध्यापक सुंगधा पाटील, शिक्षक चंद्रकांत काटकर, नितीन पाटील, प्रशांत घरत, संध्या कडू, संतोष भगत आदीने विशेष परिश्रम घेतले.

# रोहा ईपीएस-९५ पेन्शनधारकांची बैठक



**रोहे : प्रतिनिधी**

विठ्ठल मंदिर-रोहा येथे मंगळवारी राष्ट्रीय संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष अशोक राऊत (कमांडर) यांच्या आदेशानुसार राष्ट्रीय संघर्ष समितीचा आठवा वर्धापन दिन साजरा करण्यासाठी रोहा ईपीएस-९५ पेन्शन धारकांची बैठक आयोजित केली होती. या बैठकीस जवळपास ७० एक सभासद उपस्थित होते.

बैठकीच्या सुरुवातीला वसंत शेलार यांनी सर्वच उपस्थितांचे हार्दिक स्वागत केले. सुरुवातीलाच दिप प्रज्वलीत केले. या बैठकीत निधन झालेल्या पेन्शनर धारकांस भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आले. या वेळी उपस्थितांपैकी शामराव येलकर, अशोक मोरे, ठमके, देवराम कर्णेकर, दगडू बामुगडे यांनी राष्ट्रीय संघर्ष समितीचे ध्येय धोरण या विषयी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्ष मालू पाबरेकर यांनी राष्ट्रीय संघर्ष समितीने आता पर्यंत केलेल्या व सध्या चालू असलेल्या कार्य धोरणाची सविस्तर माहिती आपल्या मनोगतातून दिली. एन.ए.सी.(राष्ट्रीय संघर्ष) समिती पेन्शन धारकांना पेन्शन वाढीसाठी निस्वार्थपणे पारदर्शक असे काम करत आहेत. यावर आमचं पुर्णपणे विश्वास आहे, असे या वेळी सर्वांनुमते एक दिलाने संकल्प केले आहे.

शेवटी राष्ट्रगित घेऊन नंदकुमार भादेकर साहेब यांनी सर्वच उपस्थितांचे आभार मानुन बैठक संपली त्यानंतर कमांडर अशोक राऊत यांच्या सुचनेनुसार रोहा येथील म्हाडा कॉलनी य ठिकाणी असलेल्या मराठा भूवन जागेमध्ये राष्ट्रीय संघर्ष समितीचे सर्वच उपस्थित पदाधिकारी यांनी झाडे लावण्यात आले.

# मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या दुर्बल मुलींना मोफत वसतिगृह प्रवेश

**रायगड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या वतीने पाली (ता. सुधागड, जि. रायगड) येथील मधली आळी, राम मंदिर रोड येथे कार्यरत असलेल्या शासकीय वसतिगृहात २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.

हे वसतिगृह अनु. जाती, अनु. जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रवर्ग, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, अनाथ व अपंग मुलींसाठी असून, इयत्ता आठवीपासून पुढील शिक्षण घेणाऱ्या गरजू, गुणवंत व होतकरू विद्यार्थिनींना गुणवत्तेच्या आधारे प्रवेश दिला जातो.

वसतिगृहातील सुविधा:मोफत निवास व भोजन सुविधा,दररोज सकस नाश्ता: पोहे/उपिट/शिरा. उकडलेली दोन अंडी, सफरचंद किंवा ऋतुमानानुसार फळ व दूध. दुपार व रात्री जेवण: डाळ, भात, चपाती, भाजी/उसळ, लोणचं, पापड, आठवड्यातून दोन वेळा मांसाहार शैक्षणिक साहित्य विनामूल्य वह्या, पुस्तकं, लेखन साहित्य. गणवेशासाठी भत्ता (दोन संच) रेनकोट व छत्री भत्ता

इतर सुविधा यामध्ये संगणक प्रशिक्षण, ग्रंथालय, क्रीडा साहित्य, सांस्कृतिक व मनोरंजनात्मक उपक्रम, दरमहा रु. ६००/- निर्वाह भत्ता. प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे (सत्यप्रत जोडणे आवश्यक) तहसीलदार यांच्याकडून मिळालेला २०२५-२६ चा उत्पन्नाचा दाखला, जात प्रमाणपत्र (मुलकी अधिकारी यांच्या स्वाक्षरीसह), मागील इयत्तेचे गुणपत्रक,आधार कार्ड, शाळा/कॉलेजचे बोनाफाईड प्रमाणपत्र इ.

प्रवेशासाठी अर्ज थेट वसतिगृहात उपलब्ध असून इच्छुक विद्यार्थिनींनी किंवा त्यांच्या पालकांनी कार्यालयीन वेळेत गृहपालांशी संपर्क साधावा. पत्ता:शासकीय वसतिगृह, मधली आळी, राम मंदिर रोड, पाली, ता. सुधागड, जि. रायगड. अधिक माहितीसाठी ०२१४२,२४२६५९ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# माथेरानच्या पर्यावरणपूरक ई-रिक्षासेवेची वर्षपूर्ती

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान पर्यटनस्थाळावर सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने प्रयोगिक तत्त्वावर पर्यावरण पूरक ई-रिक्षा सुरू झाल्या. श्रमिक हातरिक्षाचालक-मालक संस्थेकडे स्टेअरिंग दिल्यानंतर एका वर्षात दोन लाख प्रवाशांनी या सेवेचा लाभ घेतला आहे. तसेच, शालेय विद्यार्थ्यांना व रुग्णांना ई-रिक्षाची अविरत सेवा देण्यात आली आहे तर या सेवेला १० जून रोजी एक वर्ष पूर्ण झाले आहे.

माथेरान शहरात प्रायोगिक तत्त्वावर २० ई-रिक्षा सुरू करण्याच्या आदेशानंतर माथेरान नगरपालिकेच्या मार्गदर्शक सूचीनुसार श्रमिक हातरिक्षाचालक-मालक संघटनेकडून प्रायोगिक तत्त्वावर ई-रिक्षा सुरू करण्यात आल्या आहेत. शालेय विद्यार्थ्यांसाठी १५ ई-रिक्षा आणि पाच ई-रिक्षा या रुग्ण आणि पर्यटक यांच्यासाठी तरतूद करण्यात आली. फक्त २० ई-रिक्षा असताना हे आव्हान स्वीकारून दररोज ३५० विद्यार्थ्यांना शाळेत सोडणे आणि आणणे ही अविरत व अखंडित सेवा देण्यात आली. ई-रिक्षा तिन्ही ऋतूंत कशा पद्धतीने सेवा देते, याचे निरीक्षण करण्यासाठी सनियंत्रण समितीने पालिकेला आदेश दिले होते. त्यानुसार पावसाळा, हिवाळा व उन्हाळा या तिन्ही ऋतूत ई-रिक्षांनी एकही अपघात न होता चांगली सेवा दिल्याचे संघटनेकडून सांगण्यात आले.



**सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतर राज्य सरकार, सनियंत्रण समिती यांच्या सूचनेनुसार पावसाळ्यात ई-रिक्षा सुस्थितीत धावतात का, हे पाहण्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर ई-रिक्षा सुरू झाल्या. तिन्ही ऋतूंत ई-रिक्षाचा सुरक्षित प्रवास झाला. त्यामुळे आता उर्वरित ७४ हातरिक्षाचालकांना ई-रिक्षा मिळण्याचा अहवाल राज्य सरकारमार्फत सर्वोच्च न्यायालयात द्यायला हवा.**

**-सुनील शिंदे, याचिकाकर्ते**

# माणगावमध्ये ४४ जणांची नेत्र तपासणी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगाव तालुक्यातील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवारी (दि.११) सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी नवीन ४४ रुग्णांची तपासणी करून ३० नेत्ररुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.

माणगावात गेली दोन वर्षांहुन अधिक काळापासून ३६ वेळा शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगाव येथील प्रसिद्ध उद्योजक विजय मेथा चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यातर्फे मोफत नेत्ररोग व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात आतापर्यंत २७६२ हुन अधिक नेत्ररुग्णांवर यशस्वी मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आलेले आहेत. विजय मेथा हे समाजात सामाजिक बांधिलकी ठेवून काम करीत असल्याने ते अशा प्रकारचे विविध सामाजिक उपक्रम माणगाव तालुक्यात राबवित असतात. नेत्ररोग शिबिराला दरमहिन्याला उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळत असून दक्षिण रायगडातून या शिबिराचा लाभ गरीब जनता घेत आहे.


दक्षिण रायगडातील माणगाव, महाड, म्हसळा, श्रीवर्धन, तळा, पोलादपूर, रोहा आदी तालुक्यांतील जवळपास गेल्या वर्षभरापासून शिबिरात २७६२ हुन अधिक रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आली.

शिबिरासाठी विजय मेथा, सुप्रिया शिंदे, तनुजा मेथा, छाया मेथा, विधिता मेथा, मनीष मेथा यांच्यासह शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेलचे टीम व्यवस्थापक डॉ.प्रकाश पाटील,डॉ.अश्विनी राऊत, दिपाली म्हात्रे, रुचिका जंगम, रामदास पवार यांनी सहकार्य करीत विशेष परिश्रम घेतले. हे शिबिर दर महिन्यातील एका बुधवारी आयोजित करण्यात येत असते.





# डॉक्टरांनी केली सायकलवरून पंढरपूर यात्रा



**कर्जत : प्रतिनिधी**

इंडो एथलेट सोसायटी पुणे यांनी दिनांक आयोजित केलेल्या पुणे-पंढरपूर डिवोशनल सायकल राईड मध्ये रायगड व कर्जत मेडिकल असोसिएशनचे सदस्य डॉ. नागेश चित्ते व डॉ. शरद तोडमल यांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन त्यांनी पुणे ते पंढरपूर हे २०५ किलोमीटरचे अंतर त्यांनी सरासरी ताशी १९.४ कि.मी या गतीने अवघ्या १० तास ३८ मिनिटांत पूर्ण केले.

डॉ. चित्ते व डॉ. तोडमल यांनी दुर्गम आणि आव्हानात्मक सायकल प्रवासात त्यांनी दाखवलेले साहस, चिकाटी आणि श्रद्धा हे निश्चितच प्रेरणादायी आहे. वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असतानाही त्यांनी आरोग्य व फिटनेससाठी दिलेले योगदान वाखाणण्या जोगे आहे. रायगड व कर्जत मेडिकल असोसिएशन यांच्या वतीने डॉ. चित्ते व डॉ. तोडमल यांचा विशेष सत्कार १ जुलै २०२५ रोजी धारप हॉल, नेरळ येथे होणाऱ्या रक्तदान शिबिराच्या वेळी केला जाणार असल्याचे अध्यक्ष डॉ. आशुतोष कुळकर्णी ह्यांनी सांगितले.

शिबिरामध्ये डोळे तपासणी, रक्त तपासणी होणार असल्याने मोठ्या संख्येने उपस्थित राहून आमचा उत्साह वाढवावा, असे आवाहन रायगड मेडिकल असोसिएशन चे सचिव डॉ. प्रशांत गांगल आणि कर्जत मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. आशिष कर्वे यांनी केले आहे.





**चौक, माणगाव : येथे सुहासिनींनी वडाच्या झाडाची पूजा करून वटपौर्णिमा उत्साहात साजरी केली.**

# चित्रकार पराग बोरसे करणार न्यूयॉर्कमध्ये लाईव्ह डेमोन्स्ट्रेशन

**कर्जत : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध असलेले कर्जतचे भारतीय कलाकार पराग दिनेश बोरसे यांना प्रतिष्ठित पेस्टल सोसायटी ऑफ अमेरिका तर्फे शनिवार, २० सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता न्यूयॉर्क शहरात त्यांच्या कलाकृतींचे लाईव्ह डेमोन्स्ट्रेशन सादर करण्यासाठी औपचारिकपणे आमंत्रित करण्यात आले आहे.



हे डेमोन्स्ट्रेशन पेस्टल सोसायटी ऑफ अमेरिका कार्यालय व स्टुडिओ, १५ ग्रामर्सी पार्क साउथ, न्यूयॉर्क येथे होणार आहे. या कार्यक्रमात जगभरातील कलाकार, संग्राहक आणि कलारसिक सहभागी होणार असून, पराग बोरसे यांच्या लोकप्रिय पेस्टल शैलीचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची ही दुर्मीळ संधी असेल.

सर जे.जे. इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाइड आर्ट, मुंबई येथून पदवी प्राप्त केलेले पराग बोरसे ग्रामीण भारताच्या जीवनशैलीवर आधारित भावपूर्ण चित्रांसाठी ओळखले जातात. त्यांना आजवर अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. २०२४ मध्ये पेस्टल सोसायटी ऑफ अमेरिका कडून 'फ्लोरा बी. गफिन' पुरस्कार मिळाल्यानंतर, त्यांचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर अजून उजळले आहे. अमेरिका, सिंगापूर,चीन, दुबई व भारतात त्यांची चित्रप्रदर्शने व चित्रकार्यशाळा झाल्या आहेत.

या निमंत्रणाबद्दल बोलताना बोरसे म्हणाले, न्यूयॉर्कमध्ये माझे चित्र प्रात्यक्षिक सादर करण्यासाठी आमंत्रण मिळणे ही माझ्यासाठी अत्यंत गौरवाची गोष्ट आहे. भारतीय कला जागतिक पातळीवर पोहोचवण्याचा मी नेहमीच प्रयत्न करतो. हे डेमोन्स्ट्रेशन पेस्टल सोसायटी ऑफ अमेरिकेच्या जागतिक दर्जाच्या कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उपक्रमाचा एक भाग आहे.'

# वैभव सूर्यवंशीची वादळी फटकेबाजी

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये आपल्या वादळी फटकेबाजीने सर्वांचे लक्ष वेधून घेणाऱ्या १४ वर्षीय वैभव सूर्यवंशीची लक्षवेधक कामगिरी सुरूच आहे. वैभवची आगामी अंडर-१९ संघात निवड करण्यात आली आहे. त्याने इंग्लंड दौऱ्यावर जाण्यापूर्वी सराव सामन्यात वादळी खेळी केली.

भारताचा १९ वर्षांखालील संघही इंग्लंड दौऱ्यावर जाणार आहे. यामध्ये आयुष म्हात्रे संघाचा कर्णधार आहे, तर वैभव सूर्यवंशी आयुषसह सलामीला उतरणार आहे. इंग्लंडला जाण्यापूर्वी बंगळुरूमधील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीत (एनसीए) खेळल्या गेलेल्या सराव सामन्यात १४ वर्षीय डावखुरा फलंदाज वैभवने धुमाकूळ घातला.



वृत्तानुसार त्याने २००पेक्षा जास्त स्ट्राईक रेटने फलंदाजी करताना फक्त ९० चेंडूत १९० धावा केल्या.

वैभव सूर्यवंशी त्याच्या गगनचुंबी षटकारांसाठीही ओळखला जातो. त्याने या सराव सामन्यात षटकारांचा

## सराव सामन्यात ९० चेंडूमध्ये केल्या १९० धावा

पाऊस पडल्याचा उल्लेखही रिपोर्टमध्ये करण्यात आला आहे. त्याच्या खेळीचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

एनसीएमध्ये या आधी झालेल्या सराव सामन्यातही वैभवने अशीच वादळी खेळी केली होती. यानंतर आता पुन्हा एकदा त्याने आपला शानदार फॉर्म दाखवून दिला. आयपीएलनंतर वैभवसमोर आता इंग्लंडचे आव्हान आहे. तो भारतीय अंडर १९ संघासह पहिल्यांदाच इंग्लंड दौऱ्यावर जात आहे. सराव सामन्यांमधील त्याची कामगिरी पाहता तो इंग्लंडमध्ये चांगली कामगिरी करेल अशी आशा आहे.

### आयपीएल गाजवली

वैभव हा यंदाच्या आयपीएलमध्ये राजस्थान रॉयल्सचा भाग होता. राजस्थान रॉयल्स फ्रँचायझीने त्याला १.१० कोटी रुपयांना खरेदी केले. वैभवने लीगमध्ये राजस्थान संघासाठी फक्त सात सामने खेळले, ज्यामध्ये त्याने २०६पेक्षा जास्त स्ट्राईक रेटने २५० पेक्षा जास्त धावा केल्या. आयपीएल पदार्पणाच्या हंगामातच त्याने एक धमाकेदार शतकही झळकावले, जे आयपीएलच्या इतिहासात भारतीय खेळाडूने केलेले सर्वात जलद शतक ठरले. वैभवने फक्त ३५ चेंडूत शतक पूर्ण केले होते.

# आंतरराष्ट्रीय निवृत्तीनंतर पूरन बनला कर्णधार

## एमसीएलमध्ये मुंबई इंडियन्स न्यू यॉर्क संघाची जबाबदारी

**मुंबई : प्रतिनिधी**

वेस्ट इंडिज क्रिकेट संघाचा धडाकेबाज फलंदाज निकोलस पूरनने वयाच्या २९व्या वर्षी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर करून क्रिकेटजगताला मोठा धक्का दिला. तो उत्तम फॉर्मात असताना त्याने तडकाफडकी निवृत्ती स्वीकारली. त्यामुळे या निर्णयामागचे कारण काय याची चर्चा रंगली असतानाच त्याला एका संघाचा कर्णधार बनवल्याचे वृत्त आहे.

यंदाच्या आयपीएलमध्ये




लखनऊ सुपर जायंट्सकडून खेळलेल्या निकोलस पूरनला एमसीएल म्हणजेच मेजर लीग क्रिकेटमध्ये मुंबई इंडियन्स न्यू यॉर्कचा कर्णधार बनवण्यात आले आहे. पूरन या संघाकडून याआधी एमसीएलमध्ये २०२३ आणि २०२४चा हंगाम खेळला, पण आता तो पहिल्यांदाच या संघाचे नेतृत्व करताना दिसणार आहे. संघाने त्याला किरॉन पोलार्डच्या जागी नवीन कर्णधार म्हणून नेमले आहे.

निकोलस पूरनने गेल्या दोन हंगामात एमआय न्यू यॉर्कसाठी १५ सामने खेळले आहेत. २०२३चा अंतिम सामना एमआय न्यू यॉर्कने जिंकला होता. त्यात पूरनने ५५ चेंडूत १३७ धावा केल्या होत्या.

# युवा बुद्धिबळपटू अर्जुन एरिगेसी भारताचा नवा अव्वल मानांकित

**बर्न : वृत्तसंस्था**

भारताचा युवा बुद्धिबळपटू अर्जुन एरिगेसीने फिडेच्या जून महिन्याच्या जागतिक क्रमवारीत भारतातील अव्वल स्थान पटकावले. त्याने डी. गुकेशला मागे टाकत तिसरे स्थान मिळवले आहे.



फिडेच्या ताज्या मानांकनानुसार एरिगेसीचे गुण २७८२, तर डी. गुकेश २७७६ गुणांसह पाचव्या स्थानी आहे. तथापि, नुकत्याच पार पडलेल्या नॉर्वे चेस २०२५ स्पर्धेनंतर लाईव्ह क्रमवारीत एरिगेसी २७७८.६ गुणांसह चौथ्या स्थानी घसरला असून गुकेश २७७६.६ गुणांसह पाचवाच राहिला आहे.

या स्पर्धेत माजी विश्वविजेता मॅग्नस कार्लसनने विक्रमी सातव्यांदा विजेतेपद पटकावले. त्याने १६ गुणांसह अव्वल स्थान पटकावले. अमेरिकेचा ग्रँडमास्टर फॅबियानो कारूआना (१५.५) दुसऱ्या स्थानावर, तर डी. गुकेश (१४.५) तिसऱ्या स्थानी राहिला.

## रबाडाने मोडला बुमराहचा विक्रम

**लंडन** : जागतिक कसोटी अजिंक्यपद (डब्ल्यूटीसी) फायनलच्या पहिल्या दिवसातील पहिल्या डावात रबाडाने दोन विकेट्स घेताच ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटीत ५० विकेट्सचा टप्पा गाठला. ही कामगिरी नोंदवताना त्याने जसप्रीत बुमराहचा रेकॉर्ड मोडीत काढला.

आतापर्यंत कसोटीत ६४ गोलंदाजांनी ऑस्ट्रेलियाविरुद्ध ५० कसोटी सामने खेळले आहेत. यातील फक्त रबाडा आणि बुमराह हे दोनच गोलंदाज असे आहेत ज्यांची ऑस्ट्रेलियाविरुद्धचा स्ट्राइक रेट ४०पेक्षा कमी आहे. बुमराहने १२ कसोटी सामन्यात ३९.९च्या स्ट्राइक रेटसह ६४ विकेट घेतल्या आहेत. दुसरीकडे रबाडाने ११ सामन्यात ३८.८च्या स्ट्राइक रेटसह ५१ विकेट्स घेतल्या आहेत.

# ऋतुराज गायकवाड यॉर्कशायर संघाशी करारबद्ध

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेटपटू ऋतुराज गायकवाडने इंग्लंडच्या प्रतिष्ठित काऊंटी चॅम्पियनशिपमध्ये आपली नवी इनिंग सुरू करण्यासाठी पाऊल टाकले आहे. त्याने यॉर्कशायर संघासोबत करार केला असून येत्या महिन्यात सुरू होणाऱ्या चॅम्पियनशिप सामन्यात तो संघात दाखल होईल. त्याशिवाय तो संपूर्ण हंगामात वन-डे कप स्पर्धेतही सहभागी होणार आहे.



ऋतुराज सध्या इंग्लंडमध्ये भारत 'अ' संघाच्या दौऱ्यावर आहे, मात्र इंग्लंड लायन्सविरुद्ध झालेल्या दोन्ही सामन्यांत त्याला खेळण्याची संधी मिळालेली नाही. विशेष म्हणजे गेल्या दोन महिन्यांपासून तो स्पर्धात्मक क्रिकेटपासून दूर होता.

आयपीएल सामन्यादरम्यान कोपराच्या दुखापतीमुळे त्याला संपूर्ण हंगामातून बाहेर व्हावे लागले. आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतासाठी २९ सामन्यांतून योगदान देणाऱ्या गायकवाडने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये सात शतके झळकावली आहेत, तर लिस्ट 'अ' क्रिकेटमध्ये त्याच्या नावावर १६ शतके आहेत. गेल्या वर्षापासून तो चेन्नई सुपर किंग्ज संघाचे नेतृत्व करत आहे.

यॉर्कशायर संघात निवड झाल्यानंतर गायकवाडने आनंद व्यक्त केला. यॉर्कशायर या प्रतिष्ठित संघासोबत खेळण्याची संधी मिळणे ही अभिमानाचा बाब आहे, असे ऋतुराज म्हणाला.

# टी-२० मुंबई लीगची आज फायनल : श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील संघाला ट्रॉफी जिंकण्याची संधी

**मुंबई : प्रतिनिधी**

युवा क्रिकेटपटू श्रेयस अय्यरने आयपीएल स्पर्धेत तीन वेगवेगळ्या फ्रँचायझी संघांना फायनलपर्यंत नेण्याचा अनोखा विक्रम नोंदवल्याचे पहायला मिळाले. यंदाच्या हंगामात श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या पंजाब किंग्जच्या संघाला अंतिम सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला. त्यानंतर आता श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील आणखी एका संघाने फायनल गाठली आहे.

आयपीएल स्पर्धा संपल्यावर श्रेयस अय्यर टी-२० मुंबई २०२५ स्पर्धेत सोबो मुंबई फाल्कन्स संघाचे नेतृत्व करताना दिसत आहे. हा संघ १२ जून रोजी मुंबईतील वानखेडेच्या मैदानावर साउथ सेंट्रल मराठा रॉयल्सविरुद्ध फायनल खेळणार आहे. सायंकाळी ७ वाजता या सामन्याला सुरुवात होईल. आयपीएल ट्रॉफीचे स्वप्न अधुरे राहिल्यावर श्रेयस अय्यरला या लीग स्पर्धेत संघाला ट्रॉफी जिंकून देत आपल्या कॅप्टन्सीचा रेकॉर्ड दमदार करण्याची संधी आहे.



टी-२० मुंबई लीगच्या तिसऱ्या हंगामातील स्पर्धेत श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील सोबो मुंबई फाल्कन्स संघाने दमदार कामगिरी करुन दाखवलीये. साखळी फेरीत पाचपैकी चार सामन्यातील विजयासह संघाने आपला दबदबा दाखवून दिला. सेमी फायनलमध्ये नमो बांद्रा ब्लास्टर्सच्या संघाला पाच विकेट्सने पराभूत करत श्रेयसच्या संघाने फायनलचे तिकीट पक्के केलेले आहे.

### फायनलमध्ये सिद्धेश लाडचे आव्हान

टी-२० मुंबई स्पर्धेत मुंबई साउथ सेंट्रल रॉयल्सच्या संघाचे नेतृत्व हे सिद्धेश लाड याच्याकडे आहे. तो यंदाच्या पर्वात कमालीची कामगिरी करताना दिसतोय. सहा सामन्यात त्याने सर्वाधिक तीन अर्धशतकांसह २२७ धावा कुटल्या आहेत. अंतिम सामन्यात तो श्रेयस अय्यरसमोर आव्हान निर्माण करू शकतो. सोबो मुंबई फाल्कन्सच्या संघाकडून श्रेयस अय्यरशिवाय आयपीएलमध्ये खास छाप सोडणारा अंगकृष्ण रघुवंशीदेखील मैदानात उतरणार आहे. त्याच्याकडूनही संघाला मोठी अपेक्षा असेल.

# 'कसोटी' संपली तर क्रिकेटचा अंत निश्चित!

## माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांचा इशारा

**पुणे : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट किती टिकेल माहीत नाही, पण कसोटी क्रिकेट संपले तर क्रिकेट संपून जाईल, कारण कसोटी क्रिकेट हे अल्टिमेट क्रिकेट आहे, असे भारतीय क्रिकेट संघ निवड समितीचे माजी अध्यक्ष आणि माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांनी व्यक्त केले.

पुणे पत्रकार संघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार संघाचे संस्थापक कै. ज. स. करंदीकर व्याख्यानमालेत वेंगसरकर बोलत होते. या वेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष सुनीत भावे, सरचिटणीस मिनाक्षी गुरव उपस्थित होते.

वेंगसरकर म्हणाले, कसोटी क्रिकेट हा सगळ्याच आव्हानात्मक फॉरमॅट आहे. हा फॉरमॅट वेगळा असून प्रत्येक सेशन महत्त्वाचे असते. प्रेक्षकांना काय हवे त्यावरही तुम्हाला लक्ष केंद्रित करावे लागते. ऑस्ट्रेलिया, इंग्लंडसारख्या देशांमध्ये कसोटी क्रिकेट बघायला प्रेक्षकांची गर्दी होते.

'भारतीय संघ सध्या इंग्लंडच्या दौऱ्यावर आहे. पहिल्या दोन कसोटी सोमन्यावरच संपूर्ण मालिकेचे भवितव्य लक्षात येईल. इंग्लंडमध्ये बॉल स्विंग होत असतात. आपला संघ तिथल्या वातारणाशी जेवढे लवकर जुळवून घेईल तेवढे चांगले आहे. शुबमन गिल, यशस्वी जैस्वाल, के.एल. राहुल यांच्याकडे या मालिकेच्या निमित्ताने चांगली संधी आहे. सगळेच म्हणतात अनुभव नाही, पण खेळल्याशिवाय अनुभव मिळणार नाही. भारताचा संघ भक्कम आहे. त्यामुळे आपला संघ तिथे चांगली कामगिरी करेल,' असा विश्वासही वेंगसरकर यांनी व्यक्त केला.

'श्रेयस अय्यर आणि माझी भेट झाली. तेव्हा त्याला सांगितले की, दुखापतग्रस्त होऊ नको. फिटनेस चांगला ठेव. श्रेयसची निवड इंग्लंडच्या दौऱ्यात व्हायला हवी होती. गिल हा गेली पाच ते सहा वर्षे आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळत आहे. त्यामुळे त्याच्या हातात भारताचे कसोटी क्रिकेटचे भविष्य सुरक्षित आहे, असेही त्यांनी सांगितले.



### ...तर आपल्याला चांगले क्रिकेटर मिळतील

'१९९२नंतर क्रिकेटमध्ये हळूहळू पैसा यायला लागला. त्याचप्रमाणे अनेक खेळाडूही क्रिकेटमध्ये यायला लागले. आयपीएलनेही पैसा आणला. आयपीएलला एवढी वर्षे झाली, तरी त्याची लोकप्रियता कमी झालेली नाही. अजूनही प्रेक्षक आयपीएल बघत असतात,' असे सांगून वेंगसरकर म्हणाले की, पैशाने क्रिकेटची भूक मंदावली आहे. खेळासाठी कोणी काही करत नाही. आपण दुलीप, इराणी करंडकावर भर दिला, तर आपल्याला चांगले क्रिकेटर मिळतील. आपल्याकडे गुणवत्ता आहे, पण व्यासपीठ मिळत नाही.






# एका मागोमाग सहा खेळाडूंची निवृत्ती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून गेल्या काही आठवड्यांमध्ये अनेक दिग्गज क्रिकेटपटूंनी निवृत्ती जाहीर करत चाहत्यांना धक्का दिला आहे. मे आणि जून २०२५मध्ये भारतीय क्रिकेटमधील दोन मोठी नाव म्हणजेच रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली, तर इतर देशांचे स्टार खेळाडूदेखील या यादीत दाखल झाले आहेत. निवृत्तीच्या या लाटेने क्रिकेटविश्वात खळबळ उडाली आहे.


मे २०२५ भारतीय संघाच्या चाहत्यांसाठी धक्कादायक आणि भावूक करणारा ठरला. ७ मे २०२५ रोजी रोहित शर्माने संध्याकाळी इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करत कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. त्यानंतर फक्त पाच दिवसांनी १२ मे २०२५ रोजी विराट कोहलीनेही कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. या दोन्ही क्रिकेटपटूंच्या कसोटी निवृत्तीनंतर एका पर्वाचा अंत झाला.

रोहित आणि विराटने भारतीय क्रिकेटला नवीन स्तरावर नेऊन ठेवले आणि त्यांच्या निवृत्तीमुळे संघात तरुण नेतृत्वाचा मार्ग मोकळा झाला आहे. रोहित आणि विराटच्या निर्णयाने चाहत्यांना आश्चर्यचकित झाले. यासह भारतीय संघाची धुरा आता युवा खेळाडूंच्या हातात असणार आहे.

यानंतर २३ मे २०२५ला श्रीलंकेचा अनुभवी अष्टपैलू खेळाडू एंजेलो मॅथ्यूजने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. मॅथ्यूजने बराच काळ खेळताना संघासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आणि त्याची निवृत्ती श्रीलंकेच्या क्रिकेटसाठी मोठा धक्का आहे.

दरम्यान, ऑस्ट्रेलियाचा स्फोटक फलंदाज ग्लेन मॅक्सवेलने २ जून २०२५ला एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. त्याच्या या निर्णयामुळे ऑस्ट्रेलियन संघासमोर एक नवीन आव्हान निर्माण झाले, पण मॅक्सवेल टी-२० स्वरूपात खेळताना दिसणार आहे.

यानंतर दक्षिण आफ्रिकेचा विस्फोटक फलंदाज हेनरिक क्लासेसने वयाच्या ३३व्या वर्षी आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या तिन्ही फॉरमॅटमधून निवृत्ती जाहीर केली. त्याने यापूर्वी कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली होती, पण आता तो आफ्रिकेकडून व्हाईट बॉल क्रिकेटमध्येही खेळताना दिसणार नाही, तर दुसरीकडे वेस्ट इंडिजच्या निकोलस पूरनने वयाच्या २९व्या वर्षीच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. त्याच्या निवृत्तीचा निर्णय सर्वांसाठीच धक्कादायक होता.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com